दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे | अंक -३३४ | बुधवार दि.१२ ऑगस्ट २०२६ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४
Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-334 | Wednesday, Dt.12 August 2026 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड ☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड ☎: 0220377, मो. 9405072777

# दूध महागले, घरचे बजेट बिघडले!

## महाराष्ट्रात आजपासून प्रतिलिटर २ रुपयांची दरवाढ..?
## चहाचा घोटही महागणार, दही-पनीर-तुपाच्या किमती वाढण्याची शक्यता..!!

मुंबई प्रतिनिधी

सणासुदीच्या काळातच महाराष्ट्रातील सर्वसामान्य नागरिकांना महागाईचा आणखी एक झटका बसला आहे. आज, ११ ऑगस्टपासून राज्यात गायी आणि म्हशीच्या दुधाच्या किरकोळ दरात प्रतिलिटर २ रुपयांची वाढ लागू झाली आहे. दूध उत्पादक व प्रक्रिया कल्याण संघाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

दूध उत्पादन, वाहतूक आणि पॅकेजिंगचा वाढता खर्च यामुळे दरवाढ करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे संघटनेने सांगितले आहे. डिझेलच्या दरात प्रतिलिटर सुमारे १० रुपयांची वाढ, तर पॅकेजिंग खर्चात सुमारे ३० टक्क्यांची वाढ झाल्याचे कारण देण्यात आले आहे. दूध खरेदीचा खर्चही वाढला असल्याने विक्रीदरात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

दुग्धजन्य पदार्थही महागणार.?


दूध दरवाढीचा परिणाम केवळ दुधापुरता मर्यादित राहण्याची शक्यता नाही. दही, तूप, पनीर आणि अन्य दुग्धजन्य पदार्थांच्या किमतीत १० टक्क्यांपर्यंत वाढ होण्याची



शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे घरगुती बजेटवर अतिरिक्त भार पडण्याची शक्यता आहे.

### ग्रामीण भागावरही परिणाम..

दूध दरवाढीमुळे ग्राहकांच्या खर्चात वाढ होणार असली तरी दूध उत्पादकांच्या वाढत्या उत्पादन व वाहतूक खर्चाचा प्रश्नही या निर्णयामागे असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील मोठ्या सहकारी व खासगी डेअऱ्यांच्या प्रतिनिधींनी दरवाढीस मंजुरी दिल्याचे वृत्त आहे.




# डायल ११२ वर खोटी माहिती देणे पडले महागात.!

## बहिण व नातवाच्या खुनाची खोटी माहिती देणाऱ्या इसमाविरुद्ध शिवाजीनगर पोलिसांत गुन्हा दाखल



बीड /प्रतिनिधी

डायल ११२ या आपत्कालीन हेल्पलाईनवर वारंवार खोटी माहिती देऊन पोलिसांची दिशाभूल करणाऱ्या इसमाविरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महावीर रतनलाल कर्नावट (वय ५०, रा. पांडुरंग रेसिडेन्सी, रामकृष्ण मंगल कार्यालयाजवळ, बीड) असे गुन्हा दाखल झालेल्या इसमाचे नाव आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. ११ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ७.५० वाजेच्या सुमारास पोलीस नियंत्रण कक्षाकडून शिवाजीनगर पोलीस ठाण्यास माहिती देण्यात आली. डायल ११२ वर एका व्यक्तीने फोन करून आपल्या हद्दीत बहिण व नातवाचा

पान २ वर...



## गुणवंत विद्यार्थ्यांचा देवदूत प्रतिष्ठानच्या वतीने सत्कार

## डॉक्टर हे देशाच्या आरोग्य व्यवस्थेत मोठा बदल घडवू शकतात - डॉ.ओमप्रकाश शेटे

दिंद्रुड (प्रतिनिधी)

वैद्यकीय क्षेत्रात करिअर करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या आणि नीट परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा देवदूत प्रतिष्ठान च्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला. आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रमुख उपस्थितीत हा गुणगौरव सोहळा संपन्न झाला. यावेळी बोलताना डॉ. शेटे यांनी आयुष्मान भारत सारख्या योजनांमधून डॉक्टर देशाच्या आरोग्य व्यवस्थेत मोठा बदल घडवू शकत असल्याचे प्रतिपादन केले.

कार्यक्रमास युवा नेते दादासाहेब मुंडे, सचिन उबाळे, प्रा. डॉ.रमेश गटकळ, नगरसेवक बालाजी चव्हाण, शिवभक्त बाळू ताकट, दैनिक लोकनेता चे संपादक बालाजी तोंडे, युवा नेते अमरसिंह मस्के, शहाजी सोळंके, अशोक करे, सतिष जोशी, दत्ता महाजन, विलास पारेकर, उद्योजक अतुल तोडकरी, संजय धपाटे, संजय पवार, बालासाहेब फपाळ, विकास थेटे, आदी मान्यवर उपस्थित होते. राष्ट्रीय पात्रता सह प्रवेश परीक्षा अर्थात नीटमध्ये उल्लेखनीय यश मिळवून वैद्यकीय, आयुर्वेदीक, दंतवैद्यकीय तसेच इतर आरोग्य विषयक पदवी अभ्यासक्रमांसाठी पात्र होणाऱ्या विद्यार्थ्यांचा यावेळी शाल, श्रीफळ आणि भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला.

या सत्कार सोहळ्याला विद्यार्थ्यांचे पालक,

पान २ वर...

# अंबाजोगाईत संत भगवानबाबांच्या १३० व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन..!

## महाप्रसाद, आरोग्य तपासणी शिबिर, जीवन गौरव पुरस्कार व भव्य शोभायात्रेचे आयोजन

अंबाजोगाई / सुनील शिरसाट

ऐश्वर्यसंपन्न श्री संत भगवानबाबा यांच्या १३० व्या जयंतीनिमित्त अंबाजोगाई येथे आज बुधवार, दि. १२ ऑगस्ट २०२६ रोजी विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. भगवानबाबा सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने हा जयंती सोहळा उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.




जयंतीनिमित्त सकाळपासून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, सकाळी ९ वाजता संत भगवानबाबांच्या मूर्तीचे पूजन व अभिषेक होणार आहे. त्यानंतर सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत मोफत आरोग्य तपासणी व रक्त तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी २ ते ४ वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

सायंकाळी ५ वाजता विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा 'जीवन गौरव पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात येणार आहे. त्यानंतर सायंकाळी ६ वाजता भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास विविध मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संत भगवानबाबांच्या जयंती सोहळ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन भगवानबाबा सार्वजनिक जयंती उत्सव समिती, अंबाजोगाई यांच्या वतीने करण्यात आले आहे.




# बीडच्या बिंदुसरा नदी पुनरुज्जीवनाला मिळणार गती.!

## पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांचे कृती आराखड्याचे निर्देश, सामाजिक कार्यकर्त्यांच्या पाठपुराव्याची दखल - डॉ. गणेश ढवळे




बीड /प्रतिनिधी

मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य नदी पुनरुज्जीवन परिषदेच्या आढावा बैठकीत राज्यातील प्रदूषित नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी तातडीने कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी दिले. बीड शहराची जीवनवाहिनी असलेल्या बिंदुसरा नदीच्या पुनरुज्जीवनासाठीही ठोस पावले उचलण्याबाबत चर्चा झाल्याने नदी पुनरुज्जीवनाला गती मिळण्याची शक्यता आहे.

पान २ वर...

# हर घर तिरंगा अभियान...

## राष्ट्रध्वज फडकविताना ध्वज संहितेचे पालन करणे बंधनकारक - केंद्र शासन

बीड (जिमाका)

भारत सरकारच्या वतीने देशभरात हर घर तिरंगा २०२६ अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत सर्व नागरिक, खाजगी संस्था, शैक्षणिक संस्था आणि विविध आस्थापनांना आपल्या घरावर व कार्यालयावर राष्ट्रध्वज फडकविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच राष्ट्रध्वज फडकविताना भारतीय ध्वज संहितेतील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक असून राष्ट्रध्वजाचा सन्मान व पावित्र्य राखण्याची विशेष दक्षता घेण्याचे निर्देशही केंद्र शासनाने दिले आहेत.

या अभियानाच्या पार्श्वभूमीवर ९ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत राबविले जात आहे. या ९दिवसांच्या कालावधीत नागरिक कोणत्याही दिवशी राष्ट्रध्वज फडकवू शकतात. केंद्र सरकारच्या जुलै २०२२ मधील सुधारित नियमांनुसार, खुल्या जागेत किंवा नागरिकांच्या घरावर फडकविण्यात आलेला राष्ट्रध्वज आता दिवस आणि रात्र अशा दोन्ही वेळेस फडकविता

पान २ वर...



## संपादकीय....

### मोदी विरोधासाठी 'अल्गोरिदम'चा रडीचा डाव

दिल्लीतील कथित विद्यार्थ्यांच्या आंदोलनानंतर राजकीय आणि सामाजिक क्षेत्रही ढवळून निघाले आहे. या आंदोलनामागचे वेगवेगळे पदर आता समोर येऊ लागले आहेत. हे पदर सामान्य माणसाच्या कल्पनाशक्तीपलीकडचे आहेत. विद्यार्थ्यांना पुढे करून हे आंदोलन पेटविणाऱ्या शक्ती विदेशात बसल्या होत्या. या शक्तींचे आंदोलन पेटविण्याचे मुख्य अस्त्रे होती ती समाजमाध्यमांतील फेसबुक, इन्स्टा आणि व्हॉट्सपसारखी लोकप्रिय आणि प्रभावी व्यासपीठे. या तीन व्यासपीठांची भारतातील सर्व थरांतील लोकप्रियता सर्वांनाच ठाऊक आहे. फेसबुक, इन्स्टा आणि व्हॉट्सप ही माध्यमे केवळ मनोरंजन या उद्देशाएवढी मर्यादित राहिलेली नाहीत. या माध्यमांनी भारतीयांच्या मेंदूचा ताबा घेतलेला आहे. आपल्या खाण्यापिण्याच्या व अन्य अनेक आवडीनिवडीवर ही माध्यमे प्रभाव टाकत आहेत. अनेकांच्या विचारशक्तीचे 'अपहरण' करून त्यांच्यावर आपली राजकीय मते बिंबवून त्याद्वारे सत्ता परिवर्तन करण्याचा कुटील डाव 'फेसबुक, इन्स्टा आणि व्हॉट्सप'ची मालकी असलेल्या मेटा या कंपनीने प्रचंड आर्थिक गुंतवणुकीच्या मोबदल्यात केला होता, असे आता उघड झाले आहे. याबद्दल केंद्र सरकारने कडक पवित्रा घेतल्यामुळे मेटाचा मालक मार्क झुकरबर्ग याला नाक घासत माफी मागावी लागली आहे. ही लोकप्रिय व्यासपीठे प्रचंड आर्थिक फायद्यात चालली पाहिजेत यासाठी झुकरबर्ग आग्रही असतो. त्यासाठी पैसा मिळवण्याचे ज्ञात, अज्ञात असे सर्व मार्ग तो वापरतो. त्यातूनच प्रेक्षकांच्या अल्गोरिदमचा ताबा मिळवून त्याद्वारे आपल्याला किंवा पैसा मोजणाऱ्या प्रायोजकाला हवा असलेला राजकीय, सांस्कृतिक विचारांचे बीजारोपण करण्याचा धंदा झुकरबर्गने सुरू केला.

पान १ वरून..

**राष्ट्रध्वज फडकविताना ....**

येऊ शकेल. तसेच राष्ट्रध्वज फडकविण्यासाठी विशिष्ट वेळ किंवा दिवसाचे कोणतेही बंधन असणार नाही. नागरिक आपल्या सोयीनुसार कोणत्याही वेळी ध्वज फडकवू शकतात. केंद्र शासनाने नियमांमध्ये सूट देण्यात आली असली तरी राष्ट्रध्वजाची प्रतिष्ठा अबाधित राखणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. त्यामुळे फाटलेला, चुरगळलेला किंवा चुकीच्या पद्धतीने ध्वज फडकवला जाणार नाही, याची प्रत्येकाने काळजी घ्यावी असे आवाहनही करण्यात आले आहे.

**डायल ११२ वर....**

खून झाल्याची माहिती दिली होती. त्यामुळे पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले.

माहिती मिळताच पोलीस निरीक्षकांच्या आदेशाने शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी तात्काळ रामकृष्ण मंगल कार्यालयाजवळील घटनास्थळी दाखल झाले. तेथे पांडुरंग रेसिडेन्सी येथे कॉलर महावीर कर्नावट याला समक्ष बोलावून त्याच्या बहिणी व नातूबाबत चौकशी करण्यात आली.

यावेळी कर्नावट याने त्याची बहीण फोन उचलत नसल्याचे सांगण्याबरोबरच काही लोक आपल्या घरी आपल्याला मारण्यासाठी आले होते, अशी माहिती पोलिसांना दिली. मात्र पोलिसांनी त्याचा भाऊ तसेच मेहुणे यांच्याकडून माहिती घेतली असता, संबंधित महिला जालना रोडवरील ओटी मंगल कार्यालयाजवळील तिच्या घरी सुखरूप असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे खुनाची माहिती पूर्णपणे खोटी असल्याचे समोर आले.

दरम्यान, याच व्यक्तीने त्याच दिवशी पहाटे ५.१५ वाजताच्या सुमारासही डायल ११२ वर फोन करून आपल्या घरावर कोणीतरी दगडफेक करून गेल्याची माहिती दिली होती. पोलिसांनी त्या ठिकाणी जाऊन पाहणी केली असता ही माहितीही खोटी असल्याचे निष्पन्न झाले.

पोलिसांच्या प्राथमिक तपासात महावीर रतनलाल कर्नावट याने पोलिसांना त्रास व्हावा व पोलिसांची दिशाभूल व्हावी या उद्देशाने डायल ११२ वर वारंवार खोटी माहिती दिल्याचे समोर आले. याप्रकरणी सहायक पोलीस निरीक्षक दीपक लंके यांच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात संबंधित इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

डायल ११२ चा गैरवापर करू नका; पोलिसांचे नागरिकांना आवाहन

दरम्यान, शिवाजीनगर पोलीस ठाणे तसेच बीड जिल्हा पोलीस दलाच्या वतीने नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, डायल ११२ ही आपत्कालीन परिस्थितीत पोलीस मदत मिळवून देणारी महत्त्वाची हेल्पलाईन आहे. या क्रमांकावर संपर्क साधल्यानंतर गरजू व्यक्तीपर्यंत शक्य तितक्या लवकर, साधारणतः १० मिनिटांच्या आत मदत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जातो.

त्यामुळे नागरिकांनी आपत्कालीन परिस्थितीत डायल ११२ चा अवश्य वापर करावा; मात्र खोटी अथवा दिशाभूल करणारी माहिती देऊन या यंत्रणेचा गैरवापर करू नये. अशा प्रकारे खोटी माहिती देणाऱ्या व्यक्तींविरुद्ध बीड जिल्हा पोलीस दलाकडून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

**गुणवंत विद्यार्थ्यांचा ....**

शिक्षक, प्रतिष्ठानचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन

पान १ वरून..

देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडूजी खांडेकर यांनी तर आभार सचिव शिवाजी हंगरगे यांनी मानले. या सत्कारामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळाली असून, देवदूत प्रतिष्ठानच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. यावेळी उपस्थित सर्वच मान्यवरांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी मोलाचे मार्गदर्शन केले.

डॉक्टर बनून गोरगरीब रुग्णांची सेवा हेच खरे ध्येय बाळगा..!

आयुष्मान भारत

नीट मधील यश ही फक्त सुरुवात आहे. डॉक्टर बनून समाजाची, विशेषतः गोरगरीब रुग्णांची सेवा करणे हे तुमचे खरे ध्येय असावे. आयुष्मान भारत सारख्या योजनांमधून तुम्ही देशाच्या आरोग्य व्यवस्थेत मोठा बदल घडवू शकता. कठोर परिश्रम, चिकाटी आणि सकारात्मक दृष्टिकोन यांच्या जोरावर कोणतेही ध्येय साध्य करता येते.

- डॉ.ओमप्रकाश शेटे (अध्यक्ष आयुष्मान भारत, समिती)

गुणवंत पण आर्थिकदृष्ट्या दुर्बल हाच प्रतिष्ठानचा मुख्य उद्देश..

देवदूत प्रतिष्ठान गेल्या अनेक वर्षांपासून शैक्षणिक, सामाजिक, आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि आरोग्य क्षेत्रात सर्वतोपरी योगदान देत आहे. समाजातील गुणवंत पण आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना मदत करणे हा प्रतिष्ठानचा मुख्य उद्देश आहे. यापुढेही नीट सारख्या स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन आणि शक्य ती मदत करण्याचे प्रतिष्ठानचे धोरण आहे.

- बंडू खांडेकर (अध्यक्ष - देवदूत प्रतिष्ठान)

**बीडच्या बिंदुसरा नदी ....**

नदी प्रदूषण कमी करणे, नैसर्गिक प्रवाह कायम ठेवणे, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प प्रभावी करणे, नदीपात्र व नदीकाठावरील अतिक्रमणे रोखणे, औद्योगिक प्रदूषणावर नियंत्रण तसेच नदीकाठ संवर्धन व वृक्षारोपणाला गती देण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. लोकसहभाग वाढविण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

बिंदुसरा नदीच्या प्रदूषणाचा प्रश्न सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांकडून सातत्याने निवेदने, आंदोलने व प्रशासकीय पाठपुराव्यातून मांडण्यात आला. या पाठपुराव्याची शासनाने दखल घेतल्याचे डॉ. ढवळे यांनी सांगितले.

राज्यातील नदी पुनरुज्जीवन मोहिमेची सुरुवात बिंदुसरा नदीपासून करावी. सांडपाणी प्रक्रिया, अतिक्रमण हटविणे, नदीपात्र संवर्धन व वृक्षारोपणासाठी कालबद्ध कृती आराखडा तयार करावा, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली.

डॉ. योगेश क्षीरसागर यांचाही पाठपुरावा...

बिंदुसरा नदी पुनरुज्जीवनासाठी भाजप नेते डॉ. योगेश क्षीरसागर यांच्याकडूनही शासनस्तरावर पाठपुरावा सुरू आहे. बीड नगरपरिषद भाजपच्या ताब्यात दिल्यास नदी पुनरुज्जीवनासाठी शासनस्तरावर विशेष प्रयत्न करण्याचे आश्वासन ना. पंकजा मुंडे यांनी निवडणुकी दरम्यान दिले होते.

पाठपुराव्याला यश...

बिंदुसरा नदीच्या पुनरुज्जीवनासाठी डॉ. गणेश ढवळे, शेख युनुस, रामनाथ खोड, माजी सैनिक अशोक येडे, रामधन जमाले, सुदाम तांदळे, मुबीन शेख आणि पांडुरंग हराळे यांनी निवेदने तसेच बिंदुसरा नदीचे पुनरुज्जीवन करा आंदोलनाच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा केला.

## मंत्रिमंडळाचे ८ महत्त्वाचे निर्णय...! भूसंपादन, ऊर्जा, शेती, शिक्षण व न्यायव्यवस्थेला मोठा दिलासा..!!

मुंबई /प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत विविध विभागांशी संबंधित एकूण आठ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. त्यातील प्रमुख निर्णय संक्षिप्त स्वरूपात पुढीलप्रमाणे, भूसंपादन मोबदला विलंबाने मिळाल्यास व्याजदरात सुधारणा भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापनेच्या मोबदल्यास विलंब झाल्यास देण्यात येणाऱ्या व्याजदरात सुधारणा करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. आता भारतीय रिझर्व्ह बँक व्यावसायिक बँकांना कर्ज देते त्या दरापेक्षा एक टक्का अधिक दराने व्याज देण्यात येणार आहे. यासाठी संबंधित कायद्याच्या कलम ७२ मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे.

नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांच्या जमीन खरेदीवरील हस्तांतरण शुल्कात २५ टक्के सूट

राज्यातील नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांना गती देण्यासाठी अशा प्रकल्पांसाठी खरेदी केलेल्या जमिनीच्या हस्तांतरण शुल्कात २५ टक्के सूट देण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र जमीन अंतिमतः नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पासाठीच वापरणे बंधनकारक राहणार आहे. अन्य कारणासाठी जमीन वापरल्यास किंवा विकल्यास शुल्क व्याजासह वसूल केले जाईल.

### नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांतील जमीन हस्तांतरणावरील मुद्रांक शुल्क माफ

मुंबई प्रतिनिधी

मुख्य कंपनीकडून खरेदी केलेली जमीन ग्रुप कंपनी किंवा विशेष उद्देश वाहन (एसपीव्ही) कंपनीकडे हस्तांतरित करताना आकारले जाणारे मुद्रांक शुल्क पूर्णपणे माफ करण्यास मंजुरी देण्यात आली. यामुळे कंपन्यांवरील आर्थिक भार कमी होऊन ऊर्जा प्रकल्पांना गती मिळणार आहे.

### कृषी विभागात संचालक, सहसंचालकांसह चार नवीन पदे

मुंबई प्रतिनिधी

कृषी आयुक्तालयात एक संचालक, एक अपर संचालक आणि दोन सहसंचालक अशी चार पदे निर्माण करण्यास मंजुरी देण्यात आली. कृषी अभियांत्रिकी, मालमत्ता व्यवस्थापन आणि ॲग्रीस्टॅक संचालनालयाच्या कामकाजासाठी ही पदे उपयुक्त ठरणार आहेत.

### किल्लारीच्या निळकंठेश्वर साखर कारखान्याला १८ कोटींच्या कर्जास मंजुरी

मुंबई प्रतिनिधी

लातूर जिल्ह्यातील किल्लारी (ता. औसा) येथील श्री निळकंठेश्वर शेतकरी सहकारी साखर कारखान्यास राष्ट्रीय सहकार विकास निगमकडून (एनसीडीसी) कर्ज घेण्यास मंजुरी देण्यात आली. कारखान्याचा १८ कोटी ९ हजार रुपयांचा कर्ज प्रस्ताव एनसीडीसीकडे पाठविण्यात येणार आहे. हा निर्णय विशेष बाब म्हणून आणि एकवेळचे उदाहरण म्हणून लागू राहील.

### खाजगी कौशल्य विद्यापीठ स्थापनेच्या नियमांत बदल

मुंबई प्रतिनिधी

राज्यात कायम स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर खाजगी कौशल्य विद्यापीठे स्थापन करण्याच्या नियमांत सुधारणा करण्यास मंजुरी देण्यात आली. विद्यापीठ स्थापनेसाठी प्रस्तावासोबत एक कोटी रुपये शुल्क, तर इरादापत्रानंतर मुदतवाढीसाठी दरवर्षी ५० लाख रुपये शुल्क आकारले जाईल. ग्रामीण भागात २५ एकर, तहसील/जिल्हा मुख्यालयी १५ एकर आणि इतर शहरी भागात १० एकर जमीन आवश्यक राहणार आहे. तसेच किमान १५ हजार चौ.मी. बांधकाम आणि काही ठिकाणी १० कोटी रुपयांचा दाननिधी आवश्यक राहील.

### समाजकार्य अभ्यासक्रमांना चालना, नवीन शाखा व तुकड्यांना मंजुरी

मुंबई प्रतिनिधी

सन २०२७-२८ पासून पारंपरिक महाविद्यालयांमध्ये समाजकार्य विषयाची स्वतंत्र विद्याशाखा सुरू करता येणार आहे. तसेच विद्यमान समाजकार्य महाविद्यालयांमध्ये कायम विनाअनुदानित तत्त्वावर नवीन अभ्यासक्रम किंवा अतिरिक्त तुकडी सुरू करण्यास मंजुरी देण्यात आली. राज्यात सध्या ६९ मान्यताप्राप्त समाजकार्य महाविद्यालये आहेत.

### हदगाव येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय

मुंबई प्रतिनिधी

नांदेड जिल्ह्यातील हदगाव येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय तसेच सरकारी वकील कार्यालय स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आली. न्यायालयासाठी १९ नियमित व ६ बाह्ययंत्रणेद्वारे अशी २५ पदे, तर सरकारी वकील कार्यालयासाठी ४ पदे मंजूर करण्यात आली. नांदेड येथील ६७१ प्रलंबित प्रकरणे हदगाव न्यायालयात हस्तांतरित होणार असून न्यायालय स्थापनेसाठी १ कोटी ८३ लाख रुपये खर्चास मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे हदगाव तालुक्यातील नागरिक व वकिलांचा वेळ आणि खर्च वाचणार आहे.

दै.समर्थ राजयोग दि.१२ ऑगस्ट २०२६

**CHANGE NAME**

I DECLARE BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME
**OLD NAME:-SYED YASMEEN BEGUM MAHEMOOD ALI**
TO CHANGE MY NEW NAME **YASMEEN ZAFAR SHAIKH**
**D/O:- MAHEMOODALI MUNIDALI SAYYAD**
**Address:- AT SANJAY NAGAR GEORAI**
DIST BEED MAHARASHTRA 431127 Mobile No:- 8625984726

# महर्षी चरकाचार्य जयंतीनिमित्त बीडमध्ये आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाची भव्य ग्रंथदिंडी

### आयुर्वेदाच्या समृद्ध ज्ञानपरंपरेचा जयघोष, विद्यार्थी-प्राध्यापकांचा उत्स्फूर्त सहभाग

बीड /प्रतिनिधी

आयुर्वेदाचे आद्य आचार्य महर्षी चरकाचार्य यांच्या जयंतीनिमित्त आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाच्या वतीने बीड शहरात भव्य ग्रंथदिंडी उत्साहात काढण्यात आली. आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा व संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम झाला.

आयुर्वेदाच्या समृद्ध ज्ञानपरंपरेचा प्रसार आणि विद्यार्थ्यांमध्ये आयुर्वेदाबद्दल अभिमान निर्माण करणे हा उपक्रमाचा उद्देश होता.




दिंडीत विद्यार्थिनींनी मृदंगाच्या साथीने वारकरी ताल व फुगडी सादर केली. लेझीम पथकाने विविध तालांसह स्वस्तिक संचलन, तर ढोल पथकाने तालबद्ध वादन करून वातावरण उत्साहपूर्ण केले. विद्यार्थ्यांनी पंचकर्म चिकित्सेचे महत्त्व सांगणारे पथनाट्यही सादर केले.

महाविद्यालयातून निघालेली दिंडी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, बालाजी मंदिर, विठ्ठल मंदिर मार्गे काळा हनुमान ठाणा मंदिरापर्यंत काढण्यात आली. विद्यार्थ्यांच्या हातात आयुर्वेद ग्रंथ, महर्षी चरकाचार्यांची प्रतिमा व आरोग्यविषयक प्रबोधनात्मक फलक होते. 'आयुर्वेद अमर रहे' घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

या आयोजनासाठी प्राचार्य वैद्य विवेक कुलकर्णी, डॉ. विनोद राहिंज, डॉ. चेतन सराफ, डॉ. मयूरी शिंदे, डॉ. प्रेरणा गायकवाड, डॉ. प्रशांत नाकाडे, डॉ. कृष्णा शिंदे आणि प्रा. रामेश्वर ढोबळे यांच्यासह प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

विद्यार्थ्यांचा उत्साह कौतुकास्पद : सुभाषचंद्र सारडा

दिंडीतील विद्यार्थ्यांचे शिस्तबद्ध व कलात्मक संचलन पाहून सुभाषचंद्र सारडा यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. आयुर्वेदाची समृद्ध सांस्कृतिक व वैद्यकीय परंपरा जोपासणे काळाची गरज आहे. आजचा अनुभव विद्यार्थ्यांसाठी भावी आयुष्यात मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## 'जिजाऊ माँसाहेब आदर्श पुरस्कार-२०२६'ने ह.भ.प. राजू महाराज लोखंडे यांचा गौरव..!

पाटोदा /प्रतिनिधी

मराठा सेवा संघ प्रणित तानुबाई बिरजे पत्रकार परिषद, आष्टी यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात ह.भ.प. राजू महाराज लोखंडे यांना प्रतिष्ठेचा 'जिजाऊ माँसाहेब आदर्श पुरस्कार-२०२६' प्रदान करून गौरविण्यात आले.

अध्यात्म व तर्कशक्तीचा संगम साधत समाजप्रबोधन, पर्यावरण संवर्धन, जनजागृती तसेच नैराश्यग्रस्तांना सकारात्मक जीवनदृष्टी देण्याच्या त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार देण्यात आला.

आष्टी येथील राजमाता जिजाऊ विद्यार्थी वसतिगृहात झालेल्या सोहळ्यात माजी कुलगुरू सर्जेराव निमसे, उद्योजक-वक्ता एन. बी. धुमाळ आणि जे. आर. पवार यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत राजू महाराज



यांना शाल, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

राजू महाराज लोखंडे यांच्या कार्याची राज्यभर दखल घेतली गेली असून, यापूर्वी त्यांना 'समाजरत्न', 'समाजभूषण', 'लोकरत्न' आणि 'महाराष्ट्र भूषण' यांसारख्या पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

## उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे आवाहन..!

### धर्मवीर आनंद दिघे साहेब प्रवासी वाहतूक चालक कल्याणकारी मंडळाच्या सदस्यत्वासाठी नोंदणी करा - सुरेश आव्हाड

बीड (जिमाका)

महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वपूर्ण निर्णयानंतर आता बीड जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या प्रवासी वाहन चालकांसाठी धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र प्रवासी वाहतुक कल्याणकारी मंडळाचे सदस्यत्व खुले करण्यात आले आहे. तरी बीड जिल्ह्यातील पात्र चालकांनी मोठ्या संख्येने नोंदणी करून शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन बीडचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेश आव्हाड यांनी केले आहे.

दिनांक २० मे २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र ऑटोरिक्षा व मीटर टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाचे कार्यक्षेत्र विस्तारण्यात आलेले आहे. त्यामुळे आता ऑटोरिक्षा व मिटर टॅक्सी चालकांसह टॅक्सी, कॅब, ॲप-आधारित ओला-उबर सेवा, पर्यटन वाहने तसेच इतर सर्व प्रवासी वाहने चालविणारे चालकही मंडळाचे सदस्य होऊ शकणार आहेत. सदस्यत्व घेतल्यानंतर पात्र चालकांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळणार असून, या निर्णयामुळे राज्यातील हजारो ॲप-आधारित कॅब चालकांनाही मोठा दिलासा मिळाला आहे. त्यामुळे प्रवासी वाहन चालकांनी विलंब न करता कल्याणकारी मंडळाचे सदस्यत्वासाठी हीींि:// रपरपववळसहशज्ञरश्रूपज्ञरीळारपवरश्रें.स या अधिकृत संकेतस्थळावर अर्ज करावा किंवा कार्यालयात सदस्यत्व नोंदणी साठी अर्ज करावा. प्रवासी चालकांच्या सामाजिक आणि आर्थिक सुरक्षेसाठी हे सदस्यत्व महत्वाचे आहे. सर्व पात्र चालकांनी नोंदणी करुन शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ घ्यावा, असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आ.सुरेश धस यांच्या संकल्पनेतील महा आरोग्य शिबीरातील रुग्णांना जिल्हा चिकित्सकांच्या हस्ते श्रवण यंत्रांचे वाटप

पाटोदा ( प्रतिनिधी )

आमदार सुरेश धस यांच्या संकल्पनेतून आयोजित मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिराचा लाभ आता गरजू रुग्णांना प्रत्यक्ष मिळण्यास सुरुवात झाली असून पाटोदा व शिरूर कासार तालुक्यातील कर्णबधिर रुग्णांना सोमवारी श्रवण यंत्रांचे वितरण करण्यात आले.

पाटोदा तालुक्यातील गांधणवाडी येथील मैनाबाई जनार्दन कदम यांच्यासह अंमळनेर पवार,थेरला येथील दगडू दगडखैर तसेच शिरूर कासार तालुक्यातील औसरमल या कर्णबधिर रुग्णांना बीड जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सतीश साळुंखे यांच्या हस्ते दिनांक १० ऑगस्ट २०२६ सोमवार रोजी श्रवण यंत्रांचे वितरण करण्यात आले. यावेळी जिल्हा रुग्णालयाचे कान, नाक,घसा तज्ज्ञ डॉ. विलास घुले यांची प्रमुख उपस्थिती होती.आमदार सुरेश आण्णा धस यांच्या संकल्पनेतून दिनांक ५ ऑगस्टपासून सलग तीन दिवस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिरात विविध आजारांच्या हजारो रुग्णांची तपासणी करून त्यांना पुढील तपासणी आणि उपचार आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन करण्यात आले.शिबिरात तपासणी झालेल्या रुग्णांना आता प्रत्यक्ष उपचार,शस्त्रक्रिया तसेच आवश्यक वैद्यकीय साहित्याचा लाभ मिळण्यास सुरुवात झाली आहे.

पाटोदा व शिरूर कासार तालुक्यातील कर्णबधिर रुग्णांची महाआरोग्य शिबिरात तपासणी करण्यात आली होती.या रुग्णांसाठी आमदार सुरेश धस यांच्या पुढाकारातून व महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून बीड जिल्हा रुग्णालयात श्रवण यंत्रे उपलब्ध करून देण्यात आली. प्राथमिक स्तरावर तपासणी झालेल्या पात्र रुग्णांना सोमवारी या श्रवण यंत्रांचे वितरण करण्यात आले.अधिकाधिक गरजू रुग्णांना लाभ मिळावा यासाठी आणखी श्रवण यंत्रांची मागणी

आमदार सुरेश धस यांच्या सूचनेनुसार महाआरोग्य शिबिरात तपासणी झालेल्या अधिकाधिक कर्णबधिर रुग्णांना श्रवण यंत्रांचा लाभ मिळावा,यासाठी बीड जिल्हा रुग्णालयात मोठ्या संख्येने आणखी श्रवण यंत्रे उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. येत्या काही दिवसांत आणखी श्रवण यंत्रे उपलब्ध होतील अशी माहिती जिल्हा रुग्णालयाच्या वतीने देण्यात आली.मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून विविध आजारांनी त्रस्त असलेल्या गरजू रुग्णांची तपासणी करून त्यांना पुढील उपचारांचा मार्ग मोकळा झाला आहे. शिबिराचा लाभ आता प्रत्यक्ष रुग्णांपर्यंत पोहोचत असल्याचा प्रत्यय सोमवारी श्रवण यंत्र वितरणाच्या माध्यमातून आला.श्रवण यंत्र मिळाल्याने गरजू रुग्णांनी समाधान व्यक्त करत आमदार सुरेश आण्णा धस तसेच त्यांच्या संपूर्ण टीमचे आभार मानले.

## जाहिर प्रगटन

सर्व जनतेस या जाहिर प्रगटनद्वारा सुचित करण्यात येते की माझे पक्षकार झैनुल्लावाद्दीन अमीर शेख रा.अंबड ता.अंबड जि.जालना यांनी दिलेली माहिती कागदपत्र व अधिकार यावरून कळविण्यात येते की शेख अजहर मो.जाफर रा.ता.जि.बीड यांच्या स्वतंत्र मालकी व ताब्यातील खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत कायम खरेदी करण्यासंबंधी माझ्या पक्षकार सोबत करारबद्ध झालेले आहेत माझे पक्षकारास अशी खात्री दिली आहे की खालील परिशिष्टात दर्शविलेल्या मिळकतीचे विक्रेते हे कायदेशीर मालक व कब्जेदार असल्याची तसेच सदर मिळकत ही पुर्णपणे निर्जोखिम निर्विवाद असल्याची व कोणतेही कायदेशीर प्रकरण न्यायप्रविष्ट नसल्याची तसेच सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारचे खाजगी व सरकारी कर्ज नसल्याची व सदर मिळकत ही कोणत्याही बँकेत अथवा पतसंस्थेस अथवा इतरही अन्य कोणत्याही संस्थेकडे गहाण किंवा तारण तसेच कुठेही मोर्डगेज नसल्याची खात्री माझे पक्षकारास दिलेली आहे तरी खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकती संबंधित कोणत्याही व्यक्तीचे कुठल्याही प्रकारचे हितसंबंध जसे चोळी बांगडी तसेच कोणत्याही बँकेचे,पतसंस्थेचे अफवा इतरही अन्य कोणत्याही खाजगी संस्थेचे दान,गहाण, तारण, लीज, बक्षीस, विक्रीपत्र विसार पावती नोटरी,करार, बँक तारणपत्र, कोर्ट केसेस, कौटुंबिक वात अथवा कोणत्याही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे सदोरील मिळकतीची मालकी व वारसा हक्का संबंधी हितसंबंध अथवा आक्षेप असल्यास सदरचे जाहीर प्रकटन प्रकाशित झाल्यापासून सात (७) दिवसाचे आत मुळ कागदपत्रे,नकला व पुराव्यासह आक्षेप माझ्या कार्यालयात नोंदवावा मुदतीमध्ये कोणताही आक्षेप न आल्यास माझे पक्षकार वरील व्यक्तीसोबत सदर मिळकत कायम खरेदी करण्याचा व्यवहार पूर्ण करील व तदनंतर आलेला कोणताही आक्षेप हा माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. मिळकतीचे परिशिष्ट कस्बे अंबड ता.अंबड जि.जालना येथील सर्वे नंबर ९१ मधील नगरपरिषद मिळकत प्लॉट नंबर १८-७६-४० ज्याची लांबी दक्षिण उत्तर १५ मीटर व रुंदी पुर्व पश्चिम १० मीटर असे एकूण क्षेत्रफळ १५० चौ.मि.आणि चतु:सिमा पूर्वेस प्लॉट नंबर ३९, पश्चिमेस प्लॉट नंबर ४१, दक्षिणेस खरात यांची जमीन उत्तरेस ९ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता करिता हे जाहिर प्रगटन प्रकाशित करण्यात आले.

**मार्फत**
**ॲड.ए.आर.बिरनावळे**
**जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय अंबड**
**मो.९९२१७६४१२३**




**माजलगाव /प्रतिनिधी**

**दिंद्रुड येथील डॉ. सोनाजीराव रांजवण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील आई-वडील नसलेल्या सुमारे ३५ विद्यार्थ्यांना गणवेश, सहा वह्या व पेन यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला.**

**कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य उजगरे जी. व्ही. होते. प्रमुख पाहुणे पोलीस निरीक्षक महेश भोसले, डॉ. दत्ता भुजबळ, संपादक बालासाहेब फपाळ पाटील व पर्यवेक्षक पी. जी. लखमावाड उपस्थित होते. राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात झाली.**

**डॉ. दत्ता भुजबळ यांनी उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांनी मन लावून अभ्यास करण्याचे आवाहन केले. महेश भोसले यांनी, मुले म्हणजे आई-वडिलांचे सोनं आणि हिरे, असे सांगत विद्यार्थ्यांना मेहनत व चांगल्या आचरणाचा संदेश दिला.**

**प्राचार्य उजगरे जी. व्ही. यांनी मदत करणाऱ्या दानशूर व्यक्ती व बालासाहेब फपाळ पाटील यांचे आभार मानले.**

**कार्यक्रमासाठी के. बी. भोसले, एस. एस. बारवकर, कटारे डी. व्ही., थावरे ए. सी., वायबसे डी. बी., डी. व्ही. ठोंबरे एस. जी., गव्हाणे आर. आर., इंगवले ए. एम., डावकर बी. व्ही., चव्हाण व्ही. आर., रायकर डी. पी., शिंदे सर, निरडे सर, तेलंग एच. आर., नाईकनवरे ए. एस., मंत्री आर. आर., कांबळे के. एस. आदींनी सहकार्य केले. गुरुवर्य भोसले सर यांनी सूत्रसंचालन, तर बारवकर सर यांनी आभार मानले.**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-७९७ दि.०५.०८.२०२६**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **रूबीना नन्हुमियाँ फुलारी रा.शहागड,ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | रूबीना नन्हुमियाँ फुलारी | स्वतः | ०३.०४.१९८६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-७८९ दि.०५.०८.२०२६**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **लक्ष्मण सोनाजी सवासे, रा.अंकुशनगर,ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **नातू**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अंश प्रशांत वायभट | नातू | २९.१०.२०२२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-७०२ दि.०३.०८.२०२६**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **इमरान ख्वाजा कुरेशी, रा.शहागड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | इमरान ख्वाजा कुरेशी | स्वतः | ०६.०७.१९८५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-६७८ दि.०३.०८.२०२६**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **हारूण फकीर महंमद बागवान, रा.शहागड, ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | हारूण फकीर म.बागवान | स्वतः | २८.१२.१९८९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-६९६ दि.०३.०८.२०२६**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **आमेर जाकेर शेख, रा.शहागड, ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आमेर जाकेर शेख | स्वतः | १२.०५.१९९८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-७०० दि.०३.०८.२०२६**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **मोबीन करीम बागवान, रा.शहागड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मोबीन करीम बागवान | स्वतः | ०५.०५.१९७७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-६९५ दि.०३.०८.२०२६**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शेख जमीर शेख जाकेर, रा.शहागड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख जमीर शेख जाकेर | स्वतः | १३.०७.१९९३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-७९० दि.०५.०८.२०२६**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **अर्जुन दशरथ तिळवणे, रा.शहागड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अर्जुन दशरथ तिळवणे | स्वतः | ०६.०४.२००८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-७९८ दि.०५.०८.२०२६**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **रेहान अन्वर तांबोळी, रा.शहागड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | रेहान अन्वर तांबोळी | स्वतः | ११.१२.२००१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-७९६ दि.०५.०८.२०२६**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **मोहसीन नन्हुमियाँ फुलारी रा.शहागड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मोहसीन नन्हुमियाँ फुलारी | स्वतः | ०५.०२.१९९४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-४२६ दि.०७.०८.२०२६**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **सुशीला राजकुमार शिंदे,रा.बाबर नगर, ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | पुजा राजकुमार शिंदे | मुलगी | ०१.०१.२००३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०७/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-४२५ दि.०७.०८.२०२६**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **मंगल अशोक फुलमाळी, रा.बाबर नगर, ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मंगल अशोक फुलमाळी | मुलगी | ०१.०१.२००४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०७/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-१४० दि.१७.०४.२०२६**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **अश्विनी कल्याण गटकळ, रा.अंतरवाली सराटी, ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | प्रांजल कल्याण गटकळ | मुलगी | २०.०८.२००८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २७/०४/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-७०१ दि.०३.०८.२०२६**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **फैजान रशीद कुरेशी, रा.शहागड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | फैजान रशीद कुरेशी | स्वतः | २४.१०.२००४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०३/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-१३९ दि.२७.०४.२०२६**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **संदिप बळीराम आव्हाड,रा.माहेर भायगाव, ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | युवराज संदीप आव्हाड | मुलगा | २६.०१.२०१० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २७/०४/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# मार्चमध्ये बसवलेले ६४ लाखांचे सिग्नल चार महिन्यातच हटवले




बीड / प्रतिनिधी

शहरातील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी पालिकेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक, नगर नाका, आण्णा भाऊ साठे चौक आणि शिवराज पान सेंटर या चार चौकात ६४ लाख रुपये खर्च करून मार्च महिन्यात आधुनिक सिग्नल बसवण्यात आले होते. मात्र एप्रिलमध्ये शहरात झालेल्या पावसामुळे एक सिग्नल कोसळला. त्यामुळे पालिकेच्या वतीने गुत्तेदारावर थेट गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर पालिकेच्या सर्वसाधारण सभेत गुत्तेदारावर निकृष्ट दर्जाचे काम केल्याचा ठपका ठेवून वर्क ऑर्डर रद्द करण्यात आली. त्यामुळे लावलेले सिग्नल गुत्तेदाराने काढून घेतले. मात्र या प्रकरणी पालिकेने अद्यापही रिटेंडर केलेला नाही.

राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत जिल्हा वार्षिक नियोजनातून बीडमधील सिग्नलसाठी ६४ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करण्यात आला होता. या निधीतून बसवलेले सिग्नल कार्यान्वित होणार होते. मात्र अचानक पाऊस झाल्याने बीड शहरातील नगर नाक्यावरील सिग्नल कोसळला होता. गुत्तेदाराने सिग्नल बसवताना सिग्नलचे ंगल आणि इतर साहित्य दर्जेदार वापरलेले असल्याचे तत्कालीन मुख्याधिकारी शैलेश फडसे म्हणाले. मात्र प्रत्यक्ष काम करताना ंगलची फुटींग थेट जमिनीवर खड्डा खोदून न करता वरवरची दुभाजकाच्या मातीत केल्याने थोडा पाऊस झाल्याने हे सिग्नल रस्त्यावर अर्धे झुकले.सुदैवाने नागरिकाच्या अंगावर पडले नसल्याने जीवितहानी टळली. रस्त्यावर उभारण्यात येणाऱ्या सिग्नलचे काम जबाबदारीने न करता निष्काळजी पणा गुत्तेदाराला चांगलाच भोवला. एका चौकांसाठी १६ लाख रूपये खर्च करून बीडमध्ये बसवलेले सिग्नल हायटेक होते.गर्दी नुसार सिग्नलची वेळ कमी जास्त होणारी होती.हे सिग्नल अत्याधुनिक असून त्यावरील नुसत्या लाइट नाही तर पूर्ण पोलच लाल, पिवळा, हिरवा असा कलर होणार होता. चार महिने झाले तरी नव्याने टेंडर काढले नाही. दुसरीकडे बीड शहरात सिग्नल नसल्याने विविध चौकात वाहतूक कोंडी होत आहे. मुलांना आणि पालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो.

# पवारांच्या ८ खासदारांची पंतप्रधान मोदींशी चर्चा

## चर्चेला उधाण, एनडीएसोबत जाणार नाही : सोनवणे

नवी दिल्ली : वृत्तसंस्था



गेल्या काही दिवसांपासून राज्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष एनडीएत विलीन होणार, अशी चर्चा रंगली असतानाच आज दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या ८ खासदारांनी मोदींची भेट घेतली. या खासदारांच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व खासदार सुप्रिया सुळे यांनी केले. जवळपास अर्धा तास ही बैठक झाली. या बैठकीत राज्यातील प्रश्नांसह इतर प्रश्नांवर चर्चा झाल्याची माहिती आहे. दरम्यान, खा. सोनवणे यांनी आम्ही एनडीएसोबत जाणार नाही, असे स्पष्ट केले.

या भेटीत संबंधित खासदारांनी आपल्या लोकसभा मतदारसंघातील समस्या पंतप्रधानांकडे मांडल्याचे समोर येत आहे. यामध्ये काही ठिकाणी पूरपरिस्थिती तर काही ठिकाणी पावसाचा अजूनही थांगपत्ता नाही. शेतमालाची किंमत आणि विकासाच्या संदर्भात मुद्दे उपस्थित केल्याची माहिती समोर आली. खासदारांनी आपल्या मतदारसंघातील समस्या पंतप्रधानांकडे मांडल्या. यावेळी पंतप्रधानांनी या खासदारांचे म्हणणे ऐकून घेऊन समस्या सोडविल्या जातील, असे आश्वासन दिल्याची माहिती समोर आली. दरम्यान, या बैठकीत राष्ट्रवादीकडून महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, कवी अण्णाभाऊ साठे आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना भारतरत्न देण्याची मागणी करण्यात आली.

# मुंबईसह राज्यात पावसाचा जोर वाढला

मुंबई : प्रतिनिधी

मुंबईसह राज्यात पावसाचा जोर कमी झाला आहे असे वाटत असतानाच मंगळवारी (११ ऑगस्ट) पहाटेपासूनच मुंबईसह उपनगरात मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पहाटे ४ वाजल्यापासून मुसळधार पावसाला सुरुवात झाली. त्यानंतर सकाळी ७ वाजेपर्यंत पावसाचा जोर कमी झाला असला तरीही अनेक भागांत पावसाच्या तुरळक सरी बरसात असल्याचे समोर आले आहे. अशामध्ये भारतीय हवामान खात्याने महत्त्वाचा इशारा दिला आहे. मंगळवारी रायगड, रत्नागिरी, पुणे आणि सातारा जिल्ह्यांतील घाटमाथ्यावर जोरदार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.



हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, वायव्य बंगालच्या उपसागरात समुद्रसपाटीपासून सुमारे ७.६किलोमीटर उंचीवर चक्राकार वाऱ्यांची स्थिती निर्माण झाली आहे. या प्रणालीच्या प्रभावामुळे बुधवारी (१२ ऑगस्ट) या भागात नव्याने कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याची शक्यता आहे. यामुळे, हवामानात बदल झाल्याचे सांगण्यात येत आहे. अशामध्ये कोकण विभागातील बहुतांश भागांत हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. उत्तर महाराष्ट्रात पावसाचा जोर कमी झाला आहे. काही ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडू शकतो. पण बहुतांश भागांत पावसाची उघडीप राहण्याची शक्यता आहे. तसेच, मराठवाड्यात काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. तरीही, या भागांत पावसाचे प्रमाण कमी राहण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

पालघर, ठाणे, मुंबई आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये हलका पाऊस किंवा ढगाळ हवामान राहण्याची शक्यता आहे. पण, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी जोरदार ते मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आणि नाशिकच्या घाटमाथा परिसरात पावसाचा जोर कमी झाला आहे.

पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली, सोलापूर आणि अहिल्यानगर जिल्ह्यांत काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याचा अंदाज आहे. घाटमाथा परिसरात पुढील दोन ते तीन दिवस पावसाची शक्यता कायम राहणार आहे. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रात काही भागांत पाऊस, तर काही भागांत कोरडे हवामान असे मिश्र चित्र पाहायला मिळेल. छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांमधील काही भागात हलका पाऊस पडण्याची शक्यता असली, तरी बहुतांश भागांत पावसाचे प्रमाण कमी राहण्याचा अंदाज आहे.

# सर्पदंशाने आश्रमशाळेतील तीन मुलींचा मृत्यू, मंत्रालयात पडसाद



मुंबई : राज्याचे मुख्यमंत्री ज्या जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत, त्या गडचिरोलीच्या धानोरा तालुक्यातील जपतलाई निवासी आश्रम शाळेत सर्पदंशाने तीन विद्यार्थिनींचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, आश्रमशाळेत झोपलेल्या ६ विद्यार्थींना एकाचवेळी सर्पदंश झाला. त्यामध्ये, तीन विद्यार्थीनींचा मृत्यू झाला असून तीन विद्यार्थिनी जखमी असल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या दुर्दैवी आणि संतापजनक घटनेचे पडसाद आज मंत्रालयात उमटल्याचं दिसून आलं. आदिवासी मंत्री महोदयांनी याबाबत, संबंधित आश्रमशाळेच्या संस्थापकांविरुद्ध मंत्रिमंडळ बैठकीत संताप व्यक्त केला. तर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही आश्रमशाळेची पाहणी करणाऱ्या अधिकाऱ्यास निलंबित करण्याचे आदेश दिले आहेत.


गडचिरोली आश्रमशाळेतील धक्कादायक घटनेचे पडसाद आज मंत्रालयात पाहायला मिळाले. आश्रमशाळेतील तीन मुलींचा मृत्यू झाल्याची बाब गंभीर असल्याचे सांगत, आदिवासीमंत्र्यांनी संताप व्यक्त केला. काँग्रेसचे मारोतराव कोवासे यांच्यासारखे ३ वेळा आमदार, एकदा खासदार राहिलेले नेते आश्रमशाळा असे चालवत असतील आणि लहान मुलींच्या सुरक्षेशी खेळत असतील, तर ते कसे माफ करणार? असा सवालच आदिवासी मंत्र्यांनी मंत्रिमंडळ बैठकीत विचारला. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या घटनेनंतर कारवाईचे आदेश दिले आहेत.

# नाशिकमध्ये भूकंपाचे धक्के सुरूच

नाशिक : प्रतिनिधी

जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून भूकंपाच्या सौम्य धक्क्यांची मालिका सुरू असल्याने नागरिकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. दिंडोरी, पेठ आणि सुरगाणा तालुक्यांमध्ये भूकंपाचे धक्के जाणवत असून काल दिवसभरात चार सौम्य धक्के जाणवल्याची माहिती समोर आली आहे. यातील एका धक्क्याची तीव्रता २.९ रिश्टर स्केल इतकी नोंदवण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पेठ परिसराच्या आसपास भूकंपाचे केंद्र असल्याचे सांगितले जात आहे. वारंवार जाणवणाऱ्या या सौम्य धक्क्यांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. मात्र, या धक्क्यांची तीव्रता कमी असल्याने मोठ्या नुकसानीची माहिती सध्या समोर आलेली नाही. भूगर्भातील हालचालींमुळे निर्माण झालेला दाब अशा सौम्य धक्क्यांच्या माध्यमातून बाहेर पडत असावा, असा प्राथमिक अंदाज तज्ज्ञांकडून व्यक्त केला जात आहे.



नागरिकांनी घाबरून न जाता प्रशासनाकडून मिळणाऱ्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

भूकंपाच्या धक्क्याने शाळेची भिंत कोसळली

दरम्यान, पेठ तालुक्यातील पाहुचीवाडी येथे भूकंपाच्या पार्श्वभूमीवर शाळेच्या इमारतीच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. काही दिवसांपूर्वी शाळेची एक भिंत कोसळल्याची घटना घडली. या शाळेत तब्बल २६५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. इमारत धोकादायक झाल्याने विद्यार्थ्यांचे वर्ग वेगवेगळ्या सुरक्षित ठिकाणी भरवण्याची वेळ प्रशासनावर आली आहे.

# पुणे-सातारा महामार्गावर भीषण अपघात; ४ ठार

शिरवळ (पुणे) : प्रतिनिधी

पुणे-सातारा महामार्गावर शिरवळ येथे मंगळवारी (११ ऑगस्ट) पहाटेच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात चार युवकांचा जागीच मृत्यू झाला. तर अन्य दोघे जखमी झाले आहेत. पुण्याहून साताऱ्याच्या दिशेने जाणाऱ्या कारवरील चालकाचं नियंत्रण सुटल्याने हा भीषण अपघात झाल्याची प्राथमिक माहिती आहे. शिरवळ येथील हॉटेल शिवालयसमोर पहाटे अपघात घडला.



मिळालेल्या माहितीनुसार, कार पुण्याहून साताऱ्याच्या दिशेनं जात होती. प्रवासादरम्यान चालकाचं कारवरील नियंत्रण सुटलं. त्यानंतर कार महामार्गावरील डिव्हायडरला जोरदार धडकून पलटी झाली. अपघाताची तीव्रता एवढी होती की पलटी झालेली कार विरुद्ध दिशेच्या लेनमध्ये जाऊन समोरून येणाऱ्या ट्रकला धडकली. कार आणि ट्रकच्या या धडकेत कारचा अक्षरश: चक्काचूर झाला. या भीषण अपघातात कारमधील चार युवकांचा मृत्यू झाला.

मृतांमध्ये तळेगाव दाभाडे येथील वेदांत अर्जुन वारिंगे (१९), कामशेत येथील सोनलिंग धीरेंद्र ठाकूर (१९), टाकवे येथील आदित्य बाळासाहेब गरुड (१९) आणि कामशेत येथील निखिल बाळू राऊत (२०) यांचा समावेश आहे. सर्व मृत युवक हे मावळ परिसरातील रहिवासी असल्यानं या घटनेनं तळेगाव दाभाडे, कामशेत आणि टाकवे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या अपघातात दीक्षित दयानंद पुजारी (२०), रा. कामशेत आणि मयूर हनुमंत शिंदे (२०), रा. बहुर, कामशेत हे दोघे जखमी झाले आहेत. त्यांना तातडीने रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. मृतांपैकी तिघेजण कुटुंबातील एकुलती एक मुले होती. सर्वजण महाबळेश्वरला फिरायला जात असताना काळानं चौघांवर झडप घातली.

# रामबाग शाळा व्यवस्थापन समितीची पुनर्रचना,नवीन सदस्यांची बिनविरोध निवड

## पालक सभेला उत्स्फूर्त प्रतिसाद, शाळेच्या विकासाला मिळणार नवी दिशा

वडवणी /प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रामबाग वडवणी येथे पालक सभेत शाळा व्यवस्थापन समितीची पुनर्रचना करण्यात आली. शैक्षणिक गुणवत्ता, भौतिक सुविधांचा विकास आणि पालकांचा सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने नवीन समितीची निवड बिनविरोध करण्यात आली.

श्री. शाम विठ्ठल खरपे, श्री. गुरुप्रसाद रखमाजी डिगे, सौ. रूपाली बाळू डिगे, सौ. प्रतिक्षा अक्षय टकले, श्री. सुनील सुधीरराव ढोले, सौ. रोहिणी अजय राऊत, श्री. प्रदीप भास्करराव जोशी व सौ. उषा घनश्याम उजगरे यांची सदस्य म्हणून निवड झाली. सौ. मंदा विठ्ठल वरवडे यांची उपाध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली.

नवीन समिती

अध्यक्ष : श्री. गणेश बळीराम टकले

उपाध्यक्ष : सौ. मंदा विठ्ठल वरवडे

सदस्य : श्री. नंदकुमार दशरथ कुरकुटे, श्री. दत्तात्रय फासे, सौ. पूजा दत्तात्रय टिपरे, सौ. प्रणाली चक्रधर हेंद्रे, श्री. शाम विठ्ठल खरपे, श्री. गुरुप्रसाद रखमाजी डिगे, सौ. रूपाली बाळू डिगे, सौ. प्रतिक्षा अक्षय टकले, श्री. सुनील सुधीरराव ढोले, सौ. रोहिणी अजय राऊत, श्री. प्रदीप भास्करराव जोशी, सौ. उषा घनश्याम उजगरे.



लोकप्रतिनिधी सदस्य : सौ. रंजनाताई नागेश डिगे.

निवड झालेल्या सदस्यांचा सत्कार करून निवडीचे पत्र देण्यात आले. नवीन समितीच्या माध्यमातून शाळेच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल, असा विश्वास पालकांनी व्यक्त केला.

यावेळी शिक्षक नवनाथ घुगे, सुभाष लतिबे, दीपक आळणे, केदार मॅडम, केकान मॅडम तसेच मुख्याध्यापिका व समितीच्या सचिव तिडके मॅडम उपस्थित होत्या. तिडके मॅडम यांनी आभार मानले.

# पाटोद्यात कुरआन हिफ्ज पूर्णत्वाचा पवित्र सोहळा

१४ ऑगस्टला जामिआ इस्लामिया बहरुल उलूममध्ये चार विद्यार्थ्यांचा गौरव, नामवंत उलेमांचे मार्गदर्शन

पाटोदा /प्रतिनिधी

पाटोदा येथील जामिआ इस्लामिया बहरुल उलूम येथे पवित्र कुरआन शरीफच्या हिफ्ज (पाठांतर) पूर्णत्वानिमित्त शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट २०२६ रोजी मगरीबच्या नमाजनंतर विशेष धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हजरत मौलाना मुहम्मद इलियास खान साहेब कासमी, प्रचारक, दारुल उलूम अस्हाब-ए-कहफ, औरंगाबाद हे राहणार असून, गुजरातमधील प्रसिद्ध युवा धार्मिक विद्वान हजरत मौलाना मुफ्ती मुहम्मद सारूदी साहेब यांचे विशेष मार्गदर्शनपर भाषण होणार आहे.

या सोहळ्यात जामिआ इस्लामिया बहरुल उलूमचे चार विद्यार्थी पवित्र कुरआन शरीफचा शेवटचा धडा ऐकवून हिफ्ज पूर्णत्वाचा मान प्राप्त करणार आहेत. मान्यवर उलेमा, धार्मिक विद्वान व समाजबांधवांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात येणार आहे.

कुरआनचे संपूर्ण पाठांतर पूर्ण करणे ही विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि संस्थेसाठी अभिमानाची बाब असून, या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण आहे. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना धार्मिक शिक्षणाची प्रेरणा मिळणार आहे.

कार्यक्रमास सर्व बांधवांनी कुटुंबीयांसह मोठ्या संख्येने उपस्थित राहून हाफिज विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवावा व सामूहिक दुआमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन जामिआ इस्लामिया बहरुल उलूम, पाटोदा यांच्या वतीने करण्यात आले आहे. कार्यक्रमानंतर भोजनाची व्यवस्था असून महिलांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# अनिष्ट रुढी-परंपरा बंद झाल्याशिवाय समाजात खऱ्या अर्थाने परिवर्तन शक्य नाही-धर्माचार्य ह.भ.प.आदिनाथ महाराज आंधळे

## कडा येथे संत सावता माळी पुण्यतिथीनिमित्त काल्याचे कीर्तन

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) समाजात खऱ्या अर्थाने परिवर्तन घडवून आणायचे असेल, तर समाजाला जखडून ठेवणाऱ्या अनिष्ट रूढी आणि परंपरा बंद होणे अत्यंत गरजेचे आहे. सत्य, सातत्य आणि प्रामाणिक कर्म यांची सांगड घालून संतांच्या विचारांनुसार जीवन जगल्यासच समाजाची प्रगती होऊ शकते, असे प्रतिपादन धर्माचार्य ह.भ.प. आदिनाथ महाराज आंधळे यांनी केले.

कडा येथे संत सावता माळी यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित काल्याच्या कीर्तन कार्यक्रमात ह.भ.प. आदिनाथ महाराज आंधळे बोलत होते. यावेळी त्यांनी संत सावता माळी यांच्या जीवनकार्याचा आणि त्यांच्या कर्मप्रधान विचारांचा उपस्थितांना परिचय करून देत समाजप्रबोधन केले.

ह.भ.प. आदिनाथ महाराज आंधळे यांनी आपल्या कीर्तन सेवेत 'याल तर या रे लागे, अवघे माझ्या मागे मागे' या अभंगाचे निरूपण केले. तसेच 'धन्य ते अरण रत्नाची खान, जन्माला निधान सावता तो' या अभंगाच्या माध्यमातून संत सावता माळी यांच्या महान कार्यावर प्रकाश टाकला.



संत सावता माळी हे कर्माला सर्वोच्च महत्त्व देणारे थोर संत होते. भगवान पांडुरंगही संतांच्या भेटीसाठी अरण येथे आले होते, अशी संतपरंपरेतील कथा सांगताना महाराजांनी संत सावता माळी यांच्या भक्तीचे आणि कर्मनिष्ठेचे महत्त्व स्पष्ट केले. कर्म हेच सर्वस्व मानून प्रामाणिकपणे कर्तव्य पार पाडणे हीच खरी भक्ती आहे, असा संदेश त्यांनी दिला.

केवळ संतांचे विचार ऐकून किंवा त्यांचे गुणगान करून परिवर्तन घडत नाही, तर ते विचार प्रत्यक्ष जीवनात आचरणात आणणे आवश्यक आहे. सत्य आणि सातत्याने केलेले कर्म हीच खरी भक्ती असून, संत विचाराने जीवन जगणे सोपे नसते. त्यासाठी संयम, त्याग, कष्ट आणि सातत्याची आवश्यकता असते, असेही ह.भ.प. आदिनाथ महाराज आंधळे यांनी सांगितले.

समाजातील अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी-परंपरा आणि चुकीच्या प्रथा यांचा त्याग करून विवेकपूर्ण आणि संस्कारक्षम समाज निर्माण करण्याची गरज असल्याचे त्यांनी आपल्या कीर्तनातून अधोरेखित केले. संत सावता माळी यांच्या विचारांचा आदर्श समोर ठेवून प्रत्येकाने आपल्या कर्माशी प्रामाणिक राहावे, असा संदेशही त्यांनी उपस्थितांना दिला.

या धार्मिक व समाजप्रबोधनपर कार्यक्रमास परिसरातील प्रतिष्ठित मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने वारकरी संप्रदायाचे अनुयायी उपस्थित होते.

यावेळी सागर आप्पा धस, राजेंद्र काका धोंडे, महेश आजबे, शंकर देशमुख, प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, संतोष महाराज मोरे, अनिल ढोबळे, रमेश भोजने, डॉ. अण्णा हजारे, पत्रकार उत्तम बोडखे, राजेश राऊत, राजेंद्र तांगडे, दिगंबर बोडखे, सुनील मेहत्रे, सुभाष सोनवणे, शिवाजी एकशिंगे महाराज, रोहिदास कर्डीले, मच्छिंद्र गाडे, संपत कर्डीले, सरपंच संजय थोरवे, प्रा. डॉ. शाम सांगळे, प्रा. डॉ. मुस्ताक पानसरे, डॉ. अशोक सापते, प्राचार्य भगवान वाघुले, विकास मेहत्रे, दत्ताभाऊ होळकर, प्रदीप नाथ, बंडू शिंदे, नागेश शेलार, बापू शिंदे सर, सोमनाथ आप्रे, नारायण राऊत, बापूराव ढोबळे, तुळशीराम आडसरे, गोरख दळवी आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते. संत सावता माळी यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित या कीर्तनातून भक्तीबरोबरच कर्म, सामाजिक परिवर्तन आणि संतविचारांचा जागर करण्यात आल्याने उपस्थित वारकरी व भाविकांनी कीर्तन सेवेचा लाभ घेतला.



## तिरंगा रॅलीत उत्स्फूर्त सहभागी व्हा – बाळराजे पवार, यशराज पंडित यांचे आवाहन

ना. पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत १३ ऑगस्टला गेवराईत रॅली

गेवराई प्रतिनिधी

देशभक्ती ही प्रत्येक भारतीयाची बांधिलकी असून, तिरंगा रॅली हा कोणत्याही पक्षाचा कार्यक्रम नसून देशात सौहार्दपूर्ण व कौटुंबिक वातावरण निर्माण करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे. त्यामुळे गुरुवार, दि. १३ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता ना. पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत निघणाऱ्या तिरंगा रॅलीत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन भाजप नेते बाळराजे पवार व युवा नेते यशराज पंडित यांनी केले.

रॅलीच्या नियोजनासाठी मंगळवारी आढावा बैठक झाली. यावेळी सचिन दाभाडे, भरत गायकवाड, यशराज पंडित, न.प. गटनेते ड. राजेंद्र राक्षसभुवनकर, ड. घुंबार्डे जिजा, माजी नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, युवा नेते शिवराज पवार व माजी उपाध्यक्ष दादासाहेब गिरी उपस्थित होते.राघव वाव्हळे यांनी सूत्रसंचालन केले, तर ड. राजेंद्र राक्षसभुवनकर यांनी आभार मानले.

# शहागडमध्ये मोकाट कुत्र्यांचा थरार ११ वर्षीय चिमुकल्यावर जीवघेणा हल्ला

## ग्रामपंचायतीच्या कारभाराविरोधात नागरिकांचा एल्गार

रक्तबंबाळ मुलाला घाटी त हलवले गेवराईवरून पिसाळलेली कुत्री आणून सोडल्याचा गंभीर आरोप निष्पाप जीव गेल्यानंतरच प्रशासन जागे होणार का? संतप्त सवाल

शहागड प्रतिनिधी :-



अंबड तालुक्यातील शहागड येथे मोकाट आणि पिसाळलेल्या कुत्र्यांनी अक्षरशः उच्छाद मांडला असून, प्रशासनाच्या नाकाखाली एक भयंकर घटना घडली आहे. लक्ष्मी आई मंदिर सराफा बाजार परिसरात एका ११ वर्षीय निष्पाप चिमुकल्यावर कुत्र्याने जीवघेणा हल्ला चढवला. सोमवारी दि. १० सायंकाळी चारच्या सुमारास घडलेल्या या थरारक घटनेमुळे संपूर्ण शहागड परिसरात भीतीचे सावट पसरले असून, संतप्त ग्रामस्थांनी ग्रामपंचायत प्रशासनाविरोधात एल्गार पुकारला आहे.चिमुकल्याचा आरडाओरडा अन् नागरिकांची धावपळ

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार शहागड येथील रहिवासी मुक्तदीर कदीर बागवान यांचा ११ वर्षीय मुलगा आपल्या घरासमोर खेळत असताना अचानक एका पिसाळलेल्या कुत्र्याने त्याच्यावर हल्ला चढवला. कुत्र्याने थेट चावा घेतल्याने मुलगा प्रचंड रक्तबंबाळ झाला. चिमुकल्याच्या आकांताचा आवाज ऐकून परिसरातील नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत कुत्र्याला हुसकावून लावले. नागरिकांच्या प्रसंगावधानामुळे मुलाचा जीव वाचला असला तरी तो गंभीर जखमी झाला आहे. त्याची प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला तातडीने छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय घाटी रुग्णालयात उपचारासाठी हलवण्यात आले आहे.

ग्रामपंचायतीचे डोळे कधी उघडणार? शहागड परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून मोकाट कुत्र्यांची प्रचंड दहशत आहे. लहान मुले, शमहिला, विद्यार्थी आणि वयोवृद्ध नागरिकांना रस्त्यावरून चालताना अक्षरशः जीव मुठीत धरून चालावे लागत आहे. कुत्र्यांचे टोळके अचानक अंगावर धावून येत असल्याच्या तक्रारी वारंवार करूनही ग्रामपंचायत प्रशासन ढिम्म हललेले नाही.

एखाद्याचा जीव गेल्यानंतरच प्रशासनाला पाझर फुटणार का? असा रोकडा आणि संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत.बीड जिल्ह्यातून कुत्रे आणून सोडले जात असल्याचा खळबळजनक आरोप

या घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी अत्यंत गंभीर आरोप केला आहे.शेजारच्या बीड जिल्ह्यातील गेवराई परिसरातून भटके आणि पिसाळलेले कुत्रे शहागडच्या हद्दीत आणून सोडले जात आहेत.यामुळेच गावात कुत्र्यांचा सुळसुळाट वाढल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे.या प्रकाराची प्रशासनाने वरिष्ठ पातळीवरून तातडीने चौकशी करून वस्तुस्थिती समोर आणावी अशी जोरदार मागणी होत आहे.कागदी घोडे नाचवू नका, थेट कारवाई करा

आज एका चिमुकल्यावर हल्ला झाला उद्या एखाद्या निष्पाप नागरिकाचा जीव गेला तर त्याची जबाबदारी कोणाची? केवळ तोंडी आश्वासने आणि कागदी कारवाईत वेळ न घालवता ग्रामपंचायत प्रशासनाने प्रत्यक्ष मैदानात उतरून या मोकाट कुत्र्यांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करावा असा थेट इशारा शहागडच्या संतप्त नागरिकांनी दिला आहे.

# स्थलांतरित ऊसतोड कामगारांच्या आरोग्य-पोषणासाठी गावागावात कृती आराखडा

## आष्टीत अंगणवाडी सेविका आशा व एनएचएमसी सदस्यांचे प्रशिक्षण किचन गार्डन किटचे वाटप



परतूर प्रतिनिधी :- ऊसतोड कामगार कुटुंबांच्या स्थलांतराच्या काळात त्यांच्या आरोग्य पोषण तसेच शासकीय आरोग्य सुविधांशी जोडणी कायम राहावी यासाठी गावपातळीवर ठोस कृती आराखडा राबविण्याचा संकल्प करण्यात आला.याच उद्देशाने आष्टी येथे अंगणवाडी सेविका आशा स्वयंसेविका व एनएचएमसी सदस्यांसाठी ऊसतोड कामगारांच्या आरोग्य व पोषण विषयावर विशेष प्रशिक्षण घेण्यात आले.

आष्टी जिल्हा परिषद व पंचायत समिती परतूर तसेच मराठवाडा ग्रामीण विकास संस्था, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आष्टी येथील श्री खंडेश्वर मंदिर सामाजिक सभागृहात हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. प्रकल्प समन्वयक अश्वजित जाधव यांच्या उपस्थितीत प्रशिक्षणाचे उद्घाटन झाले.यावेळी अलका गोरे,वर्षाराणी राठोड,अनिता जाधव,मीनाक्षी मोरे तसेच जिल्हा समन्वयक एकनाथ राउत यांची प्रमुख उपस्थिती होती.प्रशिक्षणात ऊसतोड कामगार कुटुंबे ऊसतोडीसाठी स्थलांतरित होताना घ्यावयाची आरोग्यविषयक खबरदारी महिला व बालकांचे आरोग्य रक्तक्षय कुपोषण तसेच विविध आजारांपासून बचाव करण्याच्या उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. स्थलांतरानंतरही संबंधित कुटुंबांना आरोग्यसेवा व पोषणविषयक सुविधा सातत्याने मिळाव्यात यासाठी गावपातळीवरील यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली.

ऊसतोड कामगार कुटुंबांना आधारकार्ड आयुष्मान भारत कार्ड आरोग्य विमा तसेच शासनाच्या विविध आरोग्य योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी जनजागृती करण्यावरही प्रशिक्षणात विशेष भर देण्यात आला.

दरम्यान महिला व बालकांमधील रक्तक्षय आणि कुपोषण कमी करण्यासाठी परसबाग व किचन गार्डन हा प्रभावी उपाय असल्याचे सांगण्यात आले.यावेळी लाभार्थींना किचन गार्डन किटचे वाटप करण्यात आले. घराच्या परिसरात पालेभाज्या व विविध भाजीपाला पिकवून त्याचा नियमित आहारात समावेश करण्याबाबत प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करण्यात आले.

ऊसतोड कामगारांचे स्थलांतर झाले तरी त्यांच्या आरोग्य व पोषणाची साखळी खंडित होऊ नये यासाठी अंगणवाडी, आशा कार्यकर्त्या एनएचएमसी सदस्य आणि गावपातळीवरील यंत्रणांनी परस्पर समन्वयातून काम करावे असा संदेश प्रशिक्षणातून देण्यात आला.

प्रशिक्षणाचे मार्गदर्शन जिल्हा समन्वयक एकनाथ राउत यांनी केले.यावेळी गाव स्वयंसेवक आकाश चैगुले, महादेव खरात,नामदेव नाडे यांच्यासह संबंधित कार्यकर्ते व सदस्य उपस्थित होते.

स्थलांतरापूर्वीच आरोग्याची तयारी ऊसतोड कामगारांच्या आरोग्य व पोषणाचा प्रश्न केवळ स्थलांतराच्या कालावधीपुरता मर्यादित न ठेवता गावपातळीवरच आरोग्य तपासणी पोषण जनजागृती आणि शासकीय योजनांशी जोडणीचा मजबूत आराखडा तयार करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

# श्री खोलेश्वर माध्यमिक विद्यालयात क्रांती दिन उत्साहात साजरा

अंबाजोगाई, प्रतिनिधी : श्री खोलेश्वर माध्यमिक विद्यालय, अंबाजोगाई येथे ९ ऑगस्ट क्रांती दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने शाळेत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी क्रांती दिनाच्या भित्तिपत्रकाचे अनावरण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्यलढ्यातील विविध क्रांतिकारकांची माहिती जाणून घेत त्यांच्या कार्याला अभिवादन केले. यावेळी अनेक विद्यार्थी क्रांतिकारकांच्या वेशभूषेत शाळेत उपस्थित राहिले होते. त्यामुळे कार्यक्रमाला विशेष आकर्षण प्राप्त झाले.वर्गशः क्रांती दिनानिमित्त विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास, क्रांतिकारकांचे योगदान आणि देशाच्या





स्वातंत्र्यासाठी त्यांनी केलेल्या त्यागाची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत देशभक्तीपर वातावरण निर्माण केले.

या कार्यक्रमास एकूण १५ पालकांची उपस्थिती लाभली. पालकांनी विद्यार्थ्यांच्या सहभागाचे कौतुक करून अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रभक्ती आणि स्वातंत्र्यसैनिकांविषयी आदराची भावना निर्माण होते, असे मत व्यक्त केले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक श्री. अनंतराम कोपले, उपमुख्याध्यापक श्री. संदीप देशमुख, पर्यवेक्षिका श्रीमती प्रेमळ खंडागळे, कलोपासक मंडळ प्रमुख सौ स्वप्ना सेलूकर कार्यक्रम प्रमुख मोहिनी बर्दापुरे, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# नवीन पुस्तक अभ्यासक्रम प्रशिक्षणाचा भव्य शुभारंभ

परळी / प्रतिनिधी

शिक्षण क्षेत्रातील नवनवीन बदल आणि विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याच्या उद्देशाने माउंट लिटेरा झी स्कूल परळी वैजनाथ येथे इयत्ता सहावीच्या नवीन पुस्तक अभ्यासक्रम प्रशिक्षणाचा शुभारंभ आज दि ११ रोजी मोठ्या उत्साहात पार पडला.कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमापूजनाने झाली. श्रीमती फुंदे एस. एन. व श्रीमती देशपांडे एम. जी. यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी उपस्थित शिक्षकांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा गौरव केला.उद्घाटन प्रशिक्षण प्रमुख दहिफळे बी. व्ही. यांच्या हस्ते प्रशिक्षणाचे उद्घाटन झाले. राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत व प्रार्थना श्री राजकुमार ठोके सरांनी





आपल्या सुरेल आवाजात सादर करून वातावरण भारावून टाकले.सुलभकांचा सन्मानप्रशिक्षणासाठी निवडलेल्या सुलभकांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये लोंढे एम. एन. सर,अमोल कांबळे सर, राजकुमार ठोके सर, अनुपकुमार कुसुमकर सर, गजानन जोशी सर, गोचडे एफ. जी. सर व सोळंके व्ही. पी. सर यांचा समावेश होता.

प्रशिक्षणाची सुरुवात ऑनलाईन पद्धतीने प्रशिक्षणपूर्व चाचणी घेऊन करण्यात आली. याचे संचलन तंत्रस्नेही शिक्षक कुसुमकर सर यांनी केले. या प्रशिक्षणात परळी तालुक्यातील विविध शाळांमधील सहावी इयत्तेला शिकवणाऱ्या शिक्षकांचा सहभाग होता. पुढील चार दिवस हे प्रशिक्षण नियोजनानुसार पार पडणार असून शिक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.शैक्षणिक महत्त्वया प्रशिक्षणामुळे शिक्षकांना नवीन अभ्यासक्रमाची सखोल माहिती मिळणार असून विद्यार्थ्यांना अधिक प्रभावी पद्धतीने शिकवता येईल. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून प्रशिक्षण दिले जात असल्याने शिक्षकांना डिजिटल शिक्षण पद्धतीचीही ओळख होणार आहे.माउंट लिटेरा झी स्कूल परळी वैजनाथ येथे झालेल्या या कार्यक्रमाने शिक्षण क्षेत्रात नवा उत्साह निर्माण केला आहे. शिक्षकांचा सहभाग, सुलभकांचा सन्मान आणि आधुनिक पद्धतीने दिले जाणारे प्रशिक्षण यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला निश्चितच गती मिळणार आहे.

## नवीन पुस्तक अभ्यासक्रम प्रशिक्षणाचा शुभारंभ

अंबाजोगाई- प्रतिनिधी :-

शिक्षण क्षेत्रातील नवनवीन बदल आणि विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याच्या उद्देशाने माउंट लिटेरा झी स्कुल परळी वैजनाथ येथे

इयत्ता सहावीच्या नवीन पुस्तक अभ्यासक्रम प्रशिक्षणाचा शुभारंभ दि ११ऑगस्ट रोजी उत्स्फूर्तपणे झाला. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पन करून,अभिवादन करण्यात आले. श्रीमती फुंदे एस एन व श्रीमती देशपांडे एम जी यांच्या उपस्थितीत झाले, या प्रसंगी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. हे उद्घाटन प्रशिक्षण प्रमुख दहिफळे बी व्ही यांच्या हस्ते करण्यात आले तर राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत,प्रार्थना राजकुमार ठोके यांनी सुरेल आवाजात करून वातावरण भारावून टाकले सन्मानासाठी निवड केलेल्या सुलभकांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला यामध्ये लोंढे एम एन सर,अमोल कांबळे सर राजकुमार ठोके सर,अनुपकुमार कुसुमकर सर,गजानन जोशी सर,गोचडे सर, सोळंके सर,यांचा समावेश होता.

# केजच्या प्रलंबित समस्यांवर केविसं समिती आक्रमक ; तहसील कार्यालया समोर मंगळवार पासून बेमुदत उपोषण

केज/प्रतिनिधी

केज शहरातील अत्यंत महत्त्वाच्या आणि गेली अनेक वर्षे प्रलंबित असलेल्या विविध नागरी समस्यांकडे प्रशासनाचे पूर्णतः दुर्लक्ष होत असल्याने, केज विकास संघर्ष समितीच्या वतीने मंगळवार,११ ऑगस्ट पासून तहसील कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण सुरू करण्यात येत आहे.सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांच्यासह स्थानिक नागरिकांनी हे आंदोलन पुकारले आहे.

आंदोलनातील प्रमुख मागण्या:

एस.टी.बस डेपोची उभारणी:केज शहरात बीड रोडवर बस डेपो साठी साडेसात एकर जागा आरक्षित असून ही ती पडून आहे व तेथे अतिक्रमणे होत आहेत.या जागेवर किमान इलेक्ट्रिक चार्जिंग सेंटर,बस डेपो तसेच बांधा-वापरा- हस्तांतरित करा(इजढ) तत्त्वावर व्यापारी संकुल उभारून व्यापाऱ्यांना गाळे उपलब्ध करून द्यावेत.

छोटे व्यापारी व टपरी धारकांचे पुनर्वसन:

केज नगरपंचायतीच्या ताब्यात आलेल्या फलोत्पादन खात्याच्या जागेवर तात्काळ निर्णय घेऊन लहान व्यापारी आणि टपरी धारकांना गाळे बांधून द्यावेत.

बायपास/रिंगरोडची तातडीने निर्मिती:

खामगाव-पंढरपूर व अहमदपूर-अहिल्या नगर या दोन प्रमुख महामार्गांच्या जोडणी वर केज शहर आहे. भवानी चौक ते श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक दरम्यान अवजड वाहनांची प्रचंडरहदारी वाढल्याने अपघातांत अनेकांचे बळी गेले आहेत. त्यामुळे शहरासाठी तातडीने पर्यायी बायपास रस्ता उपलब्ध करावा.

स्मशानभूमीचा कायापालट:क्रांतीनगर व सोनीजवळा रोड येथील स्मशानभूमीं मध्ये अंत्यविधीसाठी लागणारे पाणी,वीज आणि नागरिकांना बसण्यासाठी शेड या प्राथमिक सुविधा नगरपंचायतीने त्वरित पुरवाव्यात.



पंचायत समितीच्या बेवारस इमारतींचा ताबा: पंचायत समिती मैदानालगत कोट्यवधी रुपये खर्चून अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी बांधलेल्या इमारती ३१ मार्च २०२६ पर्यंत ताब्यात घेण्याचे लेखी आश्वासन देऊनही प्रशासनाने ताबा घेतलेला नाही. देखभाली अभावी खिडक्या,काचा व दरवाजांची तोडफोड झाली असून तेथे नशाखोरी व बेकायदेशीर कृत्य सुरू आहेत.या इमारती पुढील १५ दिवसांत प्रशासनाने ताब्यात घेऊन कर्मचाऱ्यांना वितरित कराव्यात.

प्रशासकीय निष्काळजी पणामुळे केजच्या नागरिकांना वेठीस धरले जात असल्याने हे पाऊल उचलावे लागत असल्याचे समितीने स्पष्ट केले आहे.या निवेदनावर हनुमंत भोसले,नासेर मुंडे, शेषराव घोरपडे यांच्यासह अनेक नागरिकांच्या सह्या आहेत.केज शहराच्या विकासासाठी आणि हक्काच्या मागण्यां साठी या आंदोलनात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे,असे आवाहन हनुमंत भोसले यांनी केले आहे.

# ‘वृक्षप्रेमी आ.सुरेश आण्णा धस’ यांच्या पुढाकाराने वडाचे वृक्ष पुन्हा बहरले!

## रस्ता रुंदीकरणातही वाचवली वृक्षसंपदा

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) विकासकामे करताना निसर्ग आणि पर्यावरणाचीही जपणूक होऊ शकते, याचा आदर्श घालून देणारे काम आष्टी शहरात पाहायला मिळाले आहे. आष्टी शहरातून नुकत्याच करण्यात आलेल्या रस्ता रुंदीकरणाच्या कामामध्ये काही झाडे हटविणे अपरिहार्य झाले होते. मात्र, अनेक वर्षे जुनी आणि मोठ्या आकाराची वडाची झाडे तोडण्याऐवजी ती झाडे मुळासहित सुरक्षितपणे स्थलांतरित करण्याचा निर्णय लोकनेते, मराठवाडा भूषण तथा आ. सुरेश आण्णा धस यांनी घेतला. त्यांच्या स्वतःच्या लक्ष घालून केलेल्या प्रयत्नांमुळे वडाची २ ते ३ मोठी झाडे जेसीबीच्या साहाय्याने मुळासहित काळजीपूर्वक काढून दुसऱ्या ठिकाणी यशस्वीपणे पुनर्लागवड करण्यात आली.

आष्टी शहराच्या विकासासाठी रस्ता रुंदीकरणाचे काम सुरू असताना रस्त्याच्या परिसरातील अनेक झाडे या कामाच्या आड येत होती. विकासाच्या दृष्टीने ही झाडे काढणे आवश्यक असले, तरी वर्षानुवर्षे वाढलेली मोठी झाडे तोडणे म्हणजे पर्यावरणाची मोठी हानी होणार होती. त्यामुळे ‘झाडे तोडण्यापेक्षा ती वाचवता आली पाहिजेत’ या भूमिकेतून आ. सुरेश आण्णा धस यांनी या प्रकरणात विशेष लक्ष घातले. मोठ्या वडाच्या झाडांना मुळासहित बाहेर काढून त्यांचे दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करण्याचा पर्याय स्वीकारण्यात आला.

जेसीबीच्या साहाय्याने ही मोठी झाडे त्यांच्या मुळांना कमीत कमी इजा होईल अशा पद्धतीने जमिनीतून काढण्यात आली. त्यानंतर योग्य ठिकाणी खड्डे तयार करून ही झाडे पुन्हा जमिनीत लावण्यात आली. झाडांचे स्थलांतर हे केवळ झाड लावण्यापुरते मर्यादित न राहता त्यांची पुढील काळात निगा राखणेही महत्त्वाचे असते. त्यादृष्टीने करण्यात आलेल्या प्रयत्नांना आता यश मिळताना दिसत आहे.

यापैकी एक मोठे वडाचे झाड आष्टी येथील स्व. रामचंद्र दादा धस तालीम परिसरात पुनर्लावण्यात आले आहे. स्थलांतरानंतर या झाडाने पुन्हा चांगली मुळे धरली असून सध्या हे झाड जोमाने बहरले आहे. हिरवीगार पाने आणि वाढलेली फांद्या पाहता हे झाड नव्या ठिकाणी चांगलेच रुजल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे पर्यावरणप्रेमी नागरिकांमध्येही समाधान व्यक्त



होत आहे.

मोठ्या आणि जुन्या वृक्षांचे महत्त्व केवळ त्यांच्या सावलीपुरते मर्यादित नसते. अशी झाडे शहरातील पर्यावरणाचा समतोल राखण्यास, पक्ष्यांना आसरा देण्यास, परिसरातील तापमान नियंत्रित ठेवण्यास आणि नागरिकांना नैसर्गिक सावली उपलब्ध करून देण्यास महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे विकासकामांसाठी अशा वृक्षांची तोड न करता शक्य तिथे त्यांचे स्थलांतर करण्याचा मार्ग स्वीकारला, तर विकासासोबत पर्यावरणाचेही संवर्धन करता येते, हे आष्टीतील या उपक्रमातून अधोरेखित झाले आहे.

‘वृक्षप्रेमी आण्णा’ म्हणून ओळख निर्माण करणारे आ. सुरेश आण्णा धस यांच्या या भूमिकेमुळे विकासकाम आणि पर्यावरण संवर्धन यांचा सुंदर समन्वय साधला गेला आहे. रस्ता रुंदीकरणासारखे महत्त्वाचे विकासकाम करताना अनेक वर्षे जुन्या वृक्षांना जीवदान देण्याचा घेतलेला निर्णय निश्चितच कौतुकास्पद आहे. विशेष म्हणजे, स्थलांतरित केलेल्या वृक्षांपैकी स्व. रामचंद्र दादा धस तालीम येथे लावलेले वडाचे झाड आज बहरलेले पाहायला मिळत असल्याने या संपूर्ण प्रयत्नाचे सकारात्मक फलित नागरिकांच्या डोळ्यासमोर आले आहे.

विकासाच्या वाटेवर पुढे जात असताना पर्यावरणाचीही काळजी घेतली पाहिजे, हा संदेश या उपक्रमातून मिळत आहे. ‘विकासही हवा आणि वृक्षसंपदाही वाचली पाहिजे’ या विचारातून केलेला हा प्रयत्न आष्टी शहरासाठी आणि आगामी पिढ्यांसाठी एक प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे. मोठ्या वृक्षांना मुळासहित वाचवून त्यांना नव्या जागी पुन्हा जीवन देण्याचा हा उपक्रम इतर विकासकामांसाठीही दिशादर्शक ठरू शकतो.

# मानवाप्रमाणेच प्राण्यांच्या जीवाचंही तेच मोल, अशी क्रूरता अक्षम्य आहे

## आरोपीवर तातडीने कारवाई करा

अंबरनाथमधील ’त्या’ घटनेची संवेदशील असलेल्या ना. पंकजाताई मुंडेंनी घेतली दखल, ठाण्याच्या एसपींना केली सूचना

मुंबई प्रतिनिधी

अंबरनाथच्या रॉयल फ्लोरा फेज-२ मध्ये २६ जुलैला बाराव्या मजल्यावरून मांजरीला खाली ढकलून ठार केल्याचा व्हिडिओ सोशल मिडियावर व्हायरल झाल्यानंतर या घटनेवर राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी ठाणे जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक यांना पत्र पाठवून संबंधित व्यक्तीवर तात्काळ कारवाईसाठी पत्र पाठवले आहे.

’प्राण्यांच्या जीवाचे मोल जपणे हे आपले कर्तव्यच आहे, मी स्वतः यात लक्ष घातले आहे, अशी क्रूरता अक्ष्यम आहे’ अशा शब्दांत त्यांनी या घटनेवर संताप व्यक्त केला आहे. पोलीस अधीक्षकांना पाठवलेल्या पत्रात पंकजाताई मुंडे यांनी त्या घटनेचा उल्लेख करत नमूद केले आहे, की मांजराच्या लहान पिल्लाला इमारतीवरून एका व्यक्तीने खाली फेकल्यामुळे मृत्यू झाल्याची बदलापूर येथील घटना निदर्शनास आली आहे.

या विरोधात स्थानिक प्राणिमित्र संघटनांनी कारवाई होत नसल्याने रोष व्यक्त केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियात पसरला आहे. यातील आरोपी व्यक्तीची कृती प्राण्यांविरुद्ध क्रूरता करणारी असल्याने प्राणी क्रूरता प्रतिबंधक कायदा १९६० अन्वये दखलपात्र गुन्हा आहे. अशा व्यक्तीविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३, कलम ३२५ नुसार कोणत्याही प्राण्याला मग तो पाळीव असो भटका असो किंवा जंगली असो, ठार मारणे, विष देणे, त्याच्या शरीराचा अवयव तोडून त्याला अपंग करणे किंवा त्याला कायमचे निरुपयोगी करणे प्राण्यांवरील क्रूरता प्रतिबंधक कायदा १९६० पीसीए ॲक्ट १९६०च्या कलम ११ (१) अ नुसार प्राण्यांना शारीरिक इजा पोहोचेल अशाप्रकारे मारहाण करणे गुन्हा आहे.तसेच त्यांच्या क्षमतेपेक्षा जास्त काम करून घेणे किंवा त्यांना विनाकारण वेदना देणे प्राण्यांवरील क्रूरता प्रतिबंधक कायदा १९६० पीसीए ऍक्ट १९६० च्या कलम ११ (१) ल नुसार कोणत्याही प्राण्याला अमानुषपणे अपंग करणे किंवा स्ट्राइकनाईन सारख्या विषारी रसायनांचा वापर करून अथवा विनाकारण क्रूरपणे मारणे या विषयात मी स्वतः लक्ष घालत आहे. मानवाप्रमाणेच प्राण्यांच्या जीवाचं ही तेच मोल आहे, अशी क्रूरता अक्षम्य आहे त्याबाबत त्वरित कार्यवाही करून मला अवगत करावे, असे पंकजाताई मुंडे यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे. या पत्राची प्रत जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा प्राणीक्लेश प्रतिबंधक समिती ठाणे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त तथा सदस्य सचिव जिल्हा आणि प्राणीक्लेश प्रतिबंधक समिती जिल्हा ठाणे यांनाही पाठवण्यात आली आहे.

# बेशिस्त शिक्षकावर कारवाईची मागणी, शिक्षणाधिकाऱ्यांच्या आदेशाकडे दुर्लक्ष

## उमापूरच्या जि.प. उर्दू शाळेतील प्रभारी मुख्याध्यापकांविरोधात तक्रार,बीईओंवरही कारवाईची मागणी

बीड /प्रतिनिधी

उमापूर येथील जि.प. उर्दू प्राथमिक शाळेतील प्रभारी मुख्याध्यापक जुल्हा अदनान यांच्यावर बेशिस्ती, नियमबाह्य गैरहजेरी तसेच सहकाऱ्यांशी उद्धट वर्तन केल्याच्या तक्रारी असून, त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी शिक्षकवर्ग व शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षांनी केली आहे.

तक्रारीनुसार, जुल्हा अदनान वारंवार विनापरवानगी गैरहजर राहत असून, उपस्थितीच्या नोंदीबाबतही नियमबाह्य प्रकार केल्याचा आरोप आहे. तसेच मुख्याध्यापक पदाचा हवाला देत वर्ग न घेणे, अध्यापन न करणे आणि सहकाऱ्यांशी अपमानास्पद व अर्वाच्य भाषेत वर्तन केल्याने शाळेच्या वातावरणावर व विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत असल्याचे तक्रारीत नमूद आहे.

याप्रकरणी बीड जिल्हा परिषदेकडे तक्रार करण्यात आल्यानंतर शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण यांनी दि. २७ जुलै रोजी गेवराईचे गटशिक्षणाधिकारी नांदुरकर यांना चौकशी करून सात दिवसांत अहवाल सादर करण्याचे लेखी आदेश दिले होते. मात्र अद्याप चौकशी किंवा अहवालाची कार्यवाही झाली नसल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे.

यामुळे गटशिक्षणाधिकारी संबंधित शिक्षकाला पाठीशी घालत आहेत का ? असा सवाल पालकांकडून उपस्थित केला जात आहे.

जिल्हा परिषदेचे सीईओ जितीन रहमान यांनी प्रकरणाची दखल घेऊन दोषींवर कारवाई करावी तसेच शिक्षण विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना प्रशासकीय शिस्त लावावी, अशी मागणी होत आहे.

उमापूर येथील जि.प. उर्दू प्राथमिक शाळेतील प्रभारी मुख्याध्यापक जुल्हा अदनान यांच्यावर बेशिस्ती, नियमबाह्य

# मानेवाडीत २ कोटी १७ लाखांच्या विकासकामांचे ना. भारतशेठ गोगावले यांच्या हस्ते लोकार्पण

## रस्ते, पाणी, शिक्षण, अंगणवाडी व पथदिव्यांसह विविध कामांना चालना

बीड /प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघातील मोजे मानेवाडी गावाच्या विकासासाठी तब्बल २ कोटी १७ लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून, विविध विकासकामांचा लोकार्पण सोहळा बुधवार, दि. १३ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता मानेवाडी येथे होणार आहे.



महाराष्ट्र राज्याचे रोजगार हमी योजना, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री तथा बीड जिल्हा संपर्कमंत्री भारतशेठ गोगावले यांच्या शुभहस्ते लोकार्पण होणार असून अध्यक्षस्थानी शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख मनोजजी शिंदे राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अशोकजी पटवर्धन व शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप उपस्थित राहणार आहेत.

गावात ग्रामपंचायत भवन, पाणीपुरवठा योजना, जिल्हा परिषद शाळेच्या खोल्या, अंगणवाडी इमारत, सिमेंट रस्ते, पेव्हर ब्लॉक, पानंद रस्ते, खडीकरण-मुरुमीकरण, दलित वस्तीतील रस्ता व एलईडी पथदिवे आदी कामांचा समावेश आहे. दोन पानंद रस्त्यांची सुमारे ३ किलोमीटरची कामे हाती घेण्यात आली आहेत.

याशिवाय फिल्टर, बोअर व स्वतंत्र पाइपलाइन, नाली बांधकाम, गल्लीबोळातील सिमेंट रस्ते आणि गाव ते नदी डांबरीकरण अशी कामेही करण्यात आली आहेत. घरकुल योजनेत १४५ घरकुले, ६० गावगाठे व ९ विहिरी मंजूर झाल्या आहेत.

या सोहळ्याचे आयोजन सरपंच सौ. सोनाली प्रदीप माने, प्रदीप अंकुशराव माने, ग्रामपंचायत सदस्य व समस्त ग्रामस्थ, मोजे मानेवाडी यांच्या वतीने करण्यात आले आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# भालगाव ग्रामस्थ ग्रामसेवकाच्या शोधात

## ग्रामसेवक सापडेना ग्रामपंचायतीच्या केविलवाणी अवस्थेला जबाबदार कोण?

अंबड प्रतिनिधी :-

भालगाव ग्रामपंचायतीचा कारभार सध्या नेमका कोणाच्या भरवशावर सुरू आहे असा संतप्त सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.ग्रामसेवक कार्यालयात कधीच सापडत नाही फोनवर संपर्क होत नाही आणि नागरिकांची कामे खोळंबून पडली आहेत. त्यामुळे ग्रामस्थांची अवस्था अक्षरशः ग्रामसेवकाच्या शोधात ग्रामस्थ पण ग्रामसेवक सापडेना अशी झाली अवस्था

ग्रामपंचायत ही गावकऱ्यांच्या दैनंदिन प्रशासकीय गरजांचे केंद्र असताना ही भालगाव ग्रामपंचायतीच्या कारभाराबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.विविध दाखले नोंदी अर्ज शासकीय योजनांची कामे तसेच इतर प्रशासकीय कामांसाठी ग्रामपंचायत कार्यालयात जाणाऱ्या नागरिकांना संबंधित अधिकारी-कर्मचारी उपलब्ध नसल्याने वारंवार हेलपाटे मारावे लागत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे.

ग्रामसेवक येतात तरी कधी?

ग्रामसेवकांची कार्यालयातील उपस्थिती नेमकी कधी असते याचे उत्तरच ग्रामस्थांना मिळत नसल्याचा आरोप आहे.एखादे काम घेऊन नागरिक ग्रामपंचायत कार्यालयात पोहोचतात मात्र संबंधित ग्रामसेवक उपलब्ध नसल्याने त्यांना रिकाम्या हाताने परतावे लागते.पुन्हा दुसऱ्या दिवशी कार्यालयात यावे लागते.त्यामुळे शासकीय कार्यालय नागरिकांच्या सेवेसाठी आहे की नागरिकांनी ग्रामसेवकाच्या शोधात फिरायचे? असा सवाल उपस्थित झाला आहे.

फोन बंद मग तक्रार करायची कुठे? ग्रामसेवकांशी संपर्क साधण्यासाठी दूरध्वनीवर प्रयत्न केला जात असला तरी अनेकदा संपर्क होत नसल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे. संबंधित ग्रामसेवकांचा मोबाईल बंद असल्याने त्यांची बाजू जाणून घेण्याचाही प्रयत्न निष्फळ ठरल्याचे सांगण्यात आले.

एकीकडे कार्यालयात उपस्थितीचा प्रश्न आणि दुसरीकडे फोनवरही संपर्क नाही.मग सर्वसामान्य ग्रामस्थांनी आपली अडचण मांडायची तरी कोणाकडे? असा संतप्त सवाल आता भालगावात ऐकायला मिळत आहे.गटविकास अधिकारी अचानक पाहणी कधी करणार?

भालगाव ग्रामपंचायतीच्या कारभाराबाबत अनेकदा तक्रारी होत असताना पंचायत समिती अंबडच्या गटविकास अधिकाऱ्यांची भूमिका नेमकी काय? असा सवालही ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.कार्यालयीन उपस्थिती नोंदवही दैनंदिन कामकाज नागरिकांचे प्रलंबित अर्ज दाखले नोंदीआणि शासकीय योजनांशी संबंधित कामांची तपासणी करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी एखाद्या पूर्वसूचनेशिवाय अचानकपने ग्रामपंचायत कार्यालयात धडक द्यावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

पूर्वसूचना देऊन पाहणी करण्यापेक्षा अधिकारी अचानक पोहोचले तर ग्रामपंचायतीचा प्रत्यक्ष कारभार कसा चालतो

आणि कर्मचाऱ्यांची उपस्थिती याचे वास्तव समोर येईल असा दावा ग्रामस्थांनी केला आहे.ग्रामपंचायत कार्यालय आहे की बंद हवेली

ग्रामपंचायत कार्यालयात नागरिकांना आवश्यक सेवा वेळेत मिळणे अपेक्षित असताना कार्यालयीन कामकाजाबाबतच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.ग्रामसेवक सापडत नाही फोन लागत नाही आणि कामे पुढे सरकत नाहीत मग ग्रामपंचायतीचा कारभार चालतो तरी कसा? असा सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

ग्रामपंचायत प्रशासनाच्या या कथित अनागोंदीला जबाबदार कोण याची चौकशी करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.भालगाव ग्रामपंचायतीला वाली कोण? असा ग्रामस्थांचा थेट सवाल

ग्रामस्थांनी केलेल्या तक्रारींकडे पंचायत समिती अंबड आणि जिल्हा परिषद प्रशासनाने दुर्लक्ष करू नये. ग्रामसेवक गैरहजर असेल तर त्याची जबाबदारी कोणाची नागरिकांचे काम रखडले तर त्याची जबाबदारी कोणाची आणि प्रशासनाकडे तक्रार करूनही दखल घेतली नाही तर त्याची जबाबदारी कोणाची? असे प्रश्न आता ग्रामस्थ विचारत आहेत.

गटविकास अधिकारी पंचायत समिती अंबड यांनी भालगाव ग्रामपंचायतीची प्रत्यक्ष अचानक पाहणी करून ग्रामसेवकांच्या उपस्थितीची तपासणी करावी.नागरिकांचे किती अर्ज प्रलंबित आहेत? किती दाखले देण्यात आले किती कामांवर कार्यवाही झाली आणि कार्यालयीन वेळेत संबंधित कर्मचारी प्रत्यक्ष उपस्थित होते का याची चौकशी करावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

दोषी आढळल्यास तात्काळ कारवाई करा आणि तपासणीत व कर्तव्यात कसूर कार्यालयीन नियमांचे उल्लंघन किंवा नागरिकांच्या कामात विनाकारण दिरंगाई आढळून आल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.ग्रामपंचायत ही कोणत्याही एका व्यक्तीची किंवा गटाची मालमत्ता नसून संपूर्ण गावकऱ्यांची स्थानिक स्वराज्य संस्थेची यंत्रणा आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाला समान सेवा समान वागणूक आणि वेळेत प्रशासकीय सुविधा मिळणे हा त्याचा अधिकार आहे अशी भूमिका ग्रामस्थांनी मांडली आहे.

दखल नाही घेतली तर उपोषणाचा इशारा

ग्रामसेवकांच्या उपस्थितीबाबत आणि ग्रामपंचायतीच्या कामकाजाबाबत करण्यात आलेल्या तक्रारींची तातडीने चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्यात आली नाही तर ग्रामस्थांच्या वतीने लोकशाही मार्गाने आमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

आता पंचायत समिती अंबडचे गटविकास अधिकारी या गंभीर तक्रारींची दखल घेऊन भालगाव ग्रामपंचायतीत अचानक धडक देणार का? ग्रामसेवक कार्यालयात सापडणार का? आणि नागरिकांच्या तक्रारींचा निपटारा होणार का? याकडे भालगाव ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

ग्रामसेवकाच्या शोधात ग्रामस्थ आणि कारवाईच्या प्रतीक्षेत प्रशासन भालगाव ग्रामपंचायतीच्या या कारभाराचा पंचनामा कधी होणार? हा प्रश्न सध्या गावकऱ्यांच्या चर्चेचा विषय बनला आहे.

# अर्धापूरात १२ जनावरांसह ८.६५ लाखांचा मुद्देमाल

पोलीसांनी केला जप्त

अर्धापूर (प्रतिनिधी): पोलीस ठाण्याच्या पथकाने कारवाई करत १२ गोवंशीय जनावरांची कत्तलीच्या तावडीतून सुटका केली आहे. या कारवाईत एक महिंद्रा पिकअप वाहनासह ८ लाख ६५ हजार किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि. १० ऑगस्ट रोजी अर्धापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरक्षक महादेव मांजरमकर यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की अर्धापूर येथील करीम कॉलनी परिसरातील कॅनॉलच्या पूर्वेकडे गोवंशीय जनावरांची बेकायदेशीरपणे वाहतूक व कत्तलीच्या उद्देशाने साठवणूक केली जात आहे. माहितीच्या आधारे पोलिसांनी तात्काळ परिसरात सापळा रचून पाहणी केली. त्यावेळी एका महिंद्रा पिकअप क्र.एम.एच.३२ क्यु ५१३८ मध्ये ३ जनावरे कोंबलेली आढळली तर उर्वरित ९ जनावरे जवळील टिनपत्र्याच्या शेडमध्ये अतिशय निर्दयपणे बांधून ठेवलेली दिसली. पोलिसांनी त्वरित धाड टाकून सर्व १२



गोवंशीय जनावरांची सुरक्षित सुटका केली.


जप्त केलेला मुद्देमालात १२ गोवंशीय जनावरे अंदाजे किंमत ४,व लाख ६५ हजार, महिंद्रा पिकअप गाडी ४ लाख असा एकूण एकूण ८ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईत तुळशिदास दादाराव गावंडे (३१) रा. विठोली, जि. यवतमाळ, शेख करीमुद्दीन शेख वहीमोद्दीन ( ३८) रा. बिलालनगर, अर्धापूर, नामदेव देवराव नरवाडे ( ५८) रा. शेवाळा, जि. हिंगोली, शिवाजी किशनराव मस्के रा. शेणी, जि. नांदेड (फरार) असून या आरोपी विरोधात अर्धापूर ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पो.नि महादेव मांजरमकर, सपोनि भास्कर कांबळे, पोउपनि सुरेश भोसले, पोलीस अंमलदार भीमराव राठोड, संजय घोरपडे, सुभाष मुंगल, सलीम शहा, ज्ञानेश्वर भिसे, हेमंत बिचकेवार व कृष्णा चुनोडे यांच्या पथकाने ही कारवाई पार पाडली.

# सिडको मनपा मातृसेवा दवाखान्यात प्रसुतीगृह सुरु करा

## मनपा सर्वसाधारण सभेत नगरसेविका सौ.सुवर्णा सतिश बस्वदे यांची आग्रही मागणी

नवीन नांदेड:नांदेड वाघाळा शहर महानगर पालिकेच्या आयोजित सर्वसाधारण सभेत सिडको परिसरातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने मनपा सिडको मातृसेवा दवाखान्यात त्वरित प्रसुती सेवा गृह (मॅटर्निटी वार्ड) सुरू करण्यात यावे, अशी आग्रही मागणी नगरसेविका सौ.सुवर्णा सतिश बस्वदे यांनी प्रशासनाकडे केली आहे.

नावामनपाची सर्वसाधारण सभा ११ ऑगस्ट रोजी मुख्यालयात आयोजित करण्यात आली होती यावेळी महापौर सौ.कविता संतोष मुळे, उपमहापौर दिपक सिंह रावत, आयुक्त डॉ.महेश कुमार डोईफोडे, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम,निलेश सुंकेवार यांच्या



सह विविध विभागांचे सहायक आयुक्त,विभाग प्रमुख व नगरसेवक यांच्यी उपस्थिती होती.

यावेळी सिडको व आसपासच्या भागातील लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. या परिसरात मध्यमवर्गीय व सर्वसामान्य कुटुंबांची संख्या मोठी आहे. सध्या सिडको मनपा मातृ सेवा दवाखान्यात मूलभूत आरोग्य सेवा उपलब्ध असल्या, तरी प्रसुती गृहाची सोय नसल्यामुळे गरोदर महिलांना प्रसुतीसाठी लांबच्या शासकीय रुग्णालयात किंवा महागड्या खासगी रुग्णालयांमध्ये जावे लागते. ऐनवेळी होणारी ही धावपळ महिलांसाठी तसेच त्यांच्या कुटुंबासाठी अत्यंत मनस्तापदायक ठरत आहे.

या गंभीर समस्येकडे लक्ष वेधत सौ.सुवर्णा सतिश बस्वदे यांनी सर्वसाधारण सभेत सांगितले की, सिडको दवाखान्यात प्रसुती गृह सुरू झाल्यास परिसरातील गरजू व सर्वसामान्य महिलांना मोफत, सुरक्षित आणि जवळच्या ठिकाणी आरोग्य सेवा मिळू शकेल. त्यामुळे प्रशासनाने या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन आवश्यक त्या वैद्यकीय सुविधा, डॉक्टर व कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देऊन हे प्रसुती गृह त्वरित सुरू करावे.

त्यांच्या या रास्त मागणीला सभागृहातील प्रभागातील इतर सदस्यांनीही पाठिंबा दर्शवला असून, यावर सकारात्मक निर्णय घेऊन लवकरात लवकर कारवाई करण्याचे आश्वासन मनपा प्रशासनाकडून देण्यात आले.

संबंधित मागणी बाबत या पुर्वी मनपा आयुक्त यांना लेखी पत्राद्वारे मागणी केली होती.

# मनोज कोरडे यांना 'आदर्श गोरक्षक पुरस्कार' प्रदान

## मराठा साम्राज्य विजय दिनानिमित्त गौरव

### गोसेवा व गो-संरक्षणातील कार्याची दखल

माजलगाव /प्रतिनिधी

मराठा साम्राज्याच्या पराक्रमाची गाथा सांगणाऱ्या मराठा साम्राज्य विजय दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात युवा गोरक्षक व सामाजिक कार्यकर्ते मनोज सुनंदा प्रशांत कोरडे यांना 'आदर्श गोरक्षक पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. हिंदुत्ववादी विचारांचे प्रणेते ड. मिलिंद एकबोटे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार सोहळा झाला.

यावेळी गुजरातच्या त्रिपुरा सुंदरी मठाचे मठाधिपती विश्वेश्वरानंदजी महाराज, आमदार कैलास पाटील, रामनारायण मराठा, शिवाजी राजेजाधव, दिग्दर्शक व अभिनेते सुधीर निकम, रवींद्र पडवळ, गोरक्षनाथ अबुज आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी हिंदू धर्म व गो-संरक्षणासाठी अधिक प्रभावीपणे कार्य करण्याचा संकल्प करण्यात आला.

सन १७६३ मध्ये राक्षसभुवन येथे झालेल्या लढाईतील मराठ्यांच्या शौर्याच्या स्मरणार्थ मराठा साम्राज्य विजय दिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने समाजासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा गौरव करण्यात आला.




मनोज कोरडे यांनी अनेक वर्षांपासून गोसेवा, गो-संरक्षण आणि गो-तस्करीविरोधात सातत्याने कार्य केले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. गोरक्षकांच्या प्रयत्नांमुळे शेकडो गोवंशाचे प्राण वाचले असून समाजात गोमातेबद्दल जागृती निर्माण झाल्याचे मान्यवरांनी सांगितले.

यावेळी ड. मिलिंद एकबोटे यांनी हिंदू संस्कृती, गोमातेचे महत्त्व आणि मराठा साम्राज्याच्या इतिहासावर मार्गदर्शन केले. गोसेवा हीच राष्ट्रसेवा आहे, असे प्रतिपादन करत त्यांनी गोरक्षकांच्या कार्याचे कौतुक केले. कार्यक्रमाला गोरक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अखेर कडा बसस्थानकासमोरील महिनाभरापासून खुले असलेले धोकादायक खड्डे बुजविले

सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार रहेमान सय्यद यांच्या मागणीला तात्काळ यश

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) कडा शहरातील मध्यवर्ती बसस्थानकासमोर टेलिफोन वायरींगचे काम करण्यासाठी सुमारे महिनाभरापूर्वी खोदण्यात आलेले दोन मोठे खड्डे अखेर बुजविण्यात आले आहेत. संबंधित विभागाकडून वायरींगचे काम पूर्ण झाल्यानंतरही हे खड्डे दीर्घकाळ उघडेच ठेवण्यात आल्याने प्रवाशांसह विद्यार्थी, महिला व ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता. या गंभीर समस्येकडे सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार रहेमान सय्यद यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांचे लक्ष वेधून तातडीने खड्डे बुजविण्याची मागणी केली. त्यांच्या मागणीची दखल घेत संबंधित कंपनीच्या अधिकाऱ्यांनी तातडीने कर्मचाऱ्यांना पाठवून दोन्ही खड्डे बुजवून घेतले.

कडा शहरातील मध्यवर्ती बसस्थानक परिसर हा नेहमीच गजबजलेला असतो. बसस्थानकाच्या समोरच हे खड्डे असल्याने दररोज हजारो प्रवाशांना या मार्गावरून ये-जा करावी लागत होती. सकाळच्या वेळेत शाळा व महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांची मोठी वर्दळ असते. त्याचबरोबर महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच बसने प्रवास करणाऱ्या नागरिकांचीही या ठिकाणी मोठी गर्दी असते. अशा वर्दळीच्या ठिकाणी मोठे खड्डे उघडे ठेवण्यात आल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत होती.

विशेषतः रात्रीच्या वेळी या परिसरात पुरेशा प्रकाशाची सोय नसल्याने उघडे खड्डे वाहनचालक तसेच पादचाऱ्यांसाठी धोकादायक ठरत होते.




पावसाळ्याच्या दिवसांत खड्ड्यांमध्ये पाणी साचल्यास त्यांचा अंदाज येणे कठीण होऊन अपघाताची शक्यता आणखी वाढू शकते, अशी भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात होती. त्यामुळे संबंधित विभागाने काम पूर्ण झाल्यानंतर तातडीने रस्ता पूर्ववत करणे आवश्यक होते.

या समस्येची गंभीरता लक्षात घेऊन सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार रहेमान सय्यद यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करून खड्डे तातडीने बुजविण्याची मागणी केली. शासकीय किंवा इतर कोणत्याही कामासाठी रस्ता खोदणे आवश्यक असेल तर ते कामाच्या दृष्टीने योग्य आहे; मात्र काम पूर्ण झाल्यानंतर खोदलेली जागा पूर्ववत करणे ही संबंधित यंत्रणेची तितकीच महत्त्वाची जबाबदारी आहे. निष्काळजीपणामुळे एखाद्या नागरिकाचा अपघात होऊन जीवितहानी झाली, तर त्याची जबाबदारी कोण घेणार? असा सवाल रहेमान सय्यद यांनी उपस्थित केला होता.

त्यांच्या मागणीची संबंधित कंपनीच्या अधिकाऱ्यांनी तातडीने दखल घेतली. कर्मचाऱ्यांना घटनास्थळी पाठवून बसस्थानकासमोरील दोन्ही खड्डे बुजविण्याचे काम करण्यात आले. त्यामुळे गेल्या महिनाभरापासून नागरिकांना भेडसावत असलेली समस्या अखेर दूर झाली आहे.

दरम्यान, सार्वजनिक ठिकाणी कोणतेही खोदकाम करताना नागरिकांच्या सुरक्षिततेची योग्य काळजी घेणे, काम सुरू असताना आवश्यक त्या सूचना व सुरक्षाव्यवस्था करणे आणि काम पूर्ण झाल्यानंतर रस्ता पूर्ववत करणे गरजेचे आहे. संबंधित यंत्रणांनी भविष्यात अशा प्रकारच्या कामांमध्ये अधिक दक्षता घ्यावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

दरम्यान, नागरिकांच्या दैनंदिन अडचणींकडे लक्ष वेधून त्यावर तातडीने कार्यवाही होण्यासाठी पाठपुरावा केल्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार रहेमान सय्यद यांचे नागरिकांकडून कौतुक होत असून त्यांच्या सामाजिक कार्याचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

# प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत चि.अवधूत यादव ची दैदिप्यमान कामगिरी

### बीड जिल्ह्यात मुलांमध्ये प्रथम ;राष्ट्रीय ग्रामीण भागातून केज तालुक्यातही अव्वल

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत केज तालुक्यातील होळ येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचा विद्यार्थी चि. अवधूत दिगंबर यादव याने उल्लेखनीय यश संपादन करत बीड जिल्ह्यात मुलांमध्ये प्रथम क्रमांक, तसेच राष्ट्रीय ग्रामीण भागातून केज तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्याच्या या नेत्रदीपक यशामुळे होळ गावासह केज तालुका आणि शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, अवधूतवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

चि. अवधूत दिगंबर यादव याने प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेच्या तयारीसाठी सातत्यपूर्ण अभ्यास, जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर हे यश मिळविले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी स्पर्धात्मक परीक्षेतील हे यश विशेष प्रेरणादायी मानले जात आहे. अत्यंत लहान वयातच शैक्षणिक क्षेत्रात आपल्या गुणवत्तेची छाप उमटविणाऱ्या अवधूतने आपल्या शाळेचे नाव जिल्हास्तरावर उज्ज्वल केले आहे.



जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, होळ, ता. केज, जि. बीड या शाळेत शिक्षण घेणाऱ्या अवधूतच्या या यशात शाळेतील शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे प्रोत्साहन आणि त्याची अभ्यासातील सातत्यपूर्ण मेहनत यांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. शिष्यवृत्ती परीक्षेसारख्या स्पर्धात्मक परीक्षेत जिल्ह्यातील मुलांमध्ये प्रथम क्रमांक मिळविणे ही निश्चितच अभिमानास्पद कामगिरी असून, ग्रामीण भागातील शाळांमध्येही गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळत असल्याचे या यशातून स्पष्ट झाले आहे.

विशेष म्हणजे, चि. अवधूत दिगंबर यादव हा आष्टी पंचायत समितीचे कर्तव्यदक्ष माजी गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव यांचा नातू आहे. सुधाकर यादव यांनी आपल्या कार्यकाळात शिक्षण क्षेत्रात कर्तव्यनिष्ठेने काम करत शिक्षक, विद्यार्थी आणि शैक्षणिक व्यवस्थेशी संबंधित विविध उपक्रमांना चालना दिली. शिक्षण क्षेत्राशी जवळचा संबंध असलेल्या कुटुंबातील संस्कारांचा आणि शैक्षणिक वातावरणाचा अवधूतच्या जडणघडणीत निश्चितच सकारात्मक प्रभाव पडला आहे.

अवधूतच्या या यशाबद्दल आजोबा सुधाकर यादव, आई-वडील, कुटुंबीय, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा होळ येथील मुख्याध्यापक व शिक्षकवृंद, ग्रामस्थ तसेच मित्रपरिवाराने त्याचे अभिनंदन केले आहे. त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा व्यक्त होत आहेत.

प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेतील अवधूतची कामगिरी ही केवळ एका विद्यार्थ्याचे यश नसून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या गुणवत्तेचा आणि क्षमतेचा गौरव आहे. योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण अभ्यास आणि जिद्द असेल तर ग्रामीण भागातील विद्यार्थीही जिल्हा व राज्यस्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण करू शकतात, हे अवधूतने आपल्या यशातून दाखवून दिले आहे.

अवधूतच्या या यशामुळे जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, होळ या शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. त्याच्या यशामुळे शाळेतील इतर विद्यार्थ्यांनाही स्पर्धात्मक परीक्षांकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहण्याची आणि मोठी उद्दिष्टे ठेवण्याची प्रेरणा मिळणार आहे.

यश ही केवळ सुरुवात आहे; भविष्यातही अवधूतने अशीच उल्लेखनीय शैक्षणिक प्रगती करत आपल्या कुटुंबाचे, शाळेचे, गावाचे आणि तालुक्याचे नाव उज्ज्वल करावे, अशा शब्दांत त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# कीर्तन,भजन व हरिनामाच्या गजरात सावता महाराजांचा संजीवन समाधी सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न

### 'प्रपंच करत करत भक्ती करा;देव भक्ताच्या भेटीला येतात,एवढा सावता महाराजांचा अगाध महिमा'-ह.भ.प.महेश महाराज हजारे

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) प्रपंचातील जबाबदाऱ्या पार पाडत असताना देवाचे नामस्मरण, भक्ती आणि सत्कर्माची कास सोडू नये. संसार आणि भक्ती यांचा सुंदर समन्वय साधत जीवन जगावे, हाच संत शिरोमणी सावता महाराजांचा संदेश आहे. भक्तीमध्ये एवढी शक्ती आहे की, भक्ताच्या प्रेमापोटी देव स्वतः त्याच्या भेटीला येतात, एवढा सावता महाराजांचा अगाध महिमा आहे, असे प्रतिपादन ह.भ.प. महेश महाराज हजारे यांनी केले. संत शिरोमणी सावता महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त क-हेवडगाव येथे आयोजित कीर्तन सेवेत ते बोलत होते.

यावेळी ह.भ.प. महेश महाराज हजारे यांनी संत सावता महाराजांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या अभंग, विचार आणि भक्तीपरंपरेचे महत्त्व उपस्थित भाविकांना समजावून सांगितले. संत सावता महाराज हे साध्या कष्टकरी जीवनातून परमेश्वराची अखंड भक्ती करणारे महान संत होते. त्यांनी संसाराचा त्याग करून वैराग्य स्वीकारण्याऐवजी आपली दैनंदिन कर्तव्ये प्रामाणिकपणे पार पाडत नामस्मरण व भक्ती केली. त्यामुळे 'प्रपंच करत करत भक्ती करा' हा त्यांचा संदेश आजच्या धकाधकीच्या जीवनातही तितकाच मार्गदर्शक असल्याचे हजारे महाराज यांनी सांगितले.

संत सावता महाराजांच्या निस्सीम भक्तीमुळे पांडुरंगाने त्यांच्या भक्तीची दखल घेतली. भक्ती, श्रम, प्रामाणिकपणा आणि सेवाभाव यांचा आदर्श त्यांनी समाजासमोर ठेवला. संत सावता महाराजांचा महिमा अगाध असून त्यांच्या विचारांचे आचरण केल्यास प्रत्येकाच्या जीवनाला निश्चितच योग्य दिशा मिळते, असेही ह.भ.प. महेश महाराज हजारे यांनी सांगितले. यावेळी त्यांनी 'आमुची माळियाची जात । शेत लावूं बागाईत ।। आह्मा हातीं मोट नाडा । पाणी जातें फुलवाडा ।।' या संत सावता महाराजांच्या अभंगाचे निरूपण करून श्रम, कष्ट, प्रामाणिकपणा, भक्ती आणि सेवाभाव यांचा सुंदर संगम या अभंगातून कसा दिसून येतो, याचे विवेचन केले.



कीर्तनातून सामाजिक संदेश देताना ह.भ.प. हजारे महाराज यांनी तरुणांनी व्यसनांपासून दूर राहावे, मुलांवर चांगले संस्कार करावेत, आई-वडिलांचा सांभाळ करावा, मुलींना शिक्षण देऊन त्यांना सक्षम बनवावे तसेच महिला सबलीकरणाला प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन केले. संतांच्या विचारांचा केवळ जयघोष न करता ते आपल्या आचरणात आणणे हीच खरी संतसेवा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दि. ११ ऑगस्ट रोजी संत सावता महाराज संजीवन समाधी सोहळ्याची सांगता शोभायात्रा, हरिजागर, कीर्तन व महाप्रसादाने करण्यात आली. यानिमित्त क-हेवडगाव येथे सकाळपासूनच भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. शोभायात्रेत शेकडो नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. भजन, अभंग आणि हरिनामाचा गजर करत वाजतगाजत निघालेल्या शोभायात्रेत फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. 'सावतामाळी महाराज की जय'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. महिला, पुरुष, युवक तसेच ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत संत सावता महाराजांच्या चरणी आपली श्रद्धा अर्पण केली.

कीर्तन सेवेसाठी गायनाचार्य ह.भ.प. अंगद महाराज ढोले, माऊली बहिर, देविदास बर्डे, ह.भ.प. खंडागळे महाराज, बाबा सांगळे, नवनाथ टेलर सांगळे, होडशीळ, जरे मामा, म्हेत्रे महाराज क-हेवडगाव तसेच आष्टी भजनी मंडळ यांनी साथ दिली. त्यांच्या भक्तिगीत, अभंग आणि भजनामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. हरिनामाच्या गजराने आणि टाळ-मृदंगाच्या निनादाने क-हेवडगावचा परिसर भक्तिमय झाला होता.

रात्री ११.४५ वाजता संत शिरोमणी सावता महाराज यांच्या मूर्तीवर पुष्पार्पणाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी उपस्थित भाविकांनी मोठ्या श्रद्धेने संत सावता महाराजांना अभिवादन केले. त्यानंतर शेकडो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. संपूर्ण कार्यक्रमादरम्यान भाविकांमध्ये मोठा उत्साह आणि श्रद्धेचे वातावरण पाहायला मिळाले.

या धार्मिक सोहळ्यास सरपंच वंदनाताई गायकवाड, माजी सरपंच जालिंदर गायकवाड नेते, सामाजिक कार्यकर्ते परिवंत गायकवाड, भाजपा तालुका उपाध्यक्ष भगवान सांगळे, माजी सरपंच केशव बांगर, ग्रामसेविका दिपाली गायकवाड, माजी सरपंच श्रीधर खांडवे, संदीप देवा कुलकर्णी, प्रा. भागिनाथ बांगर, पत्रकार संतोष नागरगोजे यांच्यासह गावातील ज्येष्ठ नागरिक, राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर, आजी-माजी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि समस्त ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संत सावता महाराजांच्या विचारांचा जागर, भक्तीची परंपरा आणि सामाजिक एकोप्याचा संदेश देणारा हा सोहळा यशस्वी करण्यासाठी सावता प्रतिष्ठान, क-हेवडगाव तसेच गावातील तरुण, ज्येष्ठ आणि समस्त क-हेवडगावकर ग्रामस्थांनी जय्यत तयारी केली होती. ग्रामस्थांच्या एकजुटीने आणि भाविकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण सोहळ्याला भव्य स्वरूप प्राप्त झाले. कीर्तन, भजन, हरिनामाचा गजर, शोभायात्रा आणि महाप्रसाद अशा विविध धार्मिक कार्यक्रमांनी क-हेवडगाव भक्तिरसात न्हाऊन निघाले आणि संत शिरोमणी सावता महाराजांचा संजीवन समाधी सोहळा अत्यंत भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# श्री खोलेश्वर माध्यमिक विद्यालयात परिवहन समितीची बैठक उत्साहात संपन्न

अंबाजोगाई, प्रतिनिधी :

श्री खोलेश्वर माध्यमिक विद्यालय, अंबाजोगाई येथे विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीबाबत जनजागृती व मार्गदर्शन करण्यासाठी परिवहन समितीची बैठक उत्साहात संपन्न झाली.

कार्यक्रमाची सुरुवात सर्व मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. मान्यवरांचे येतोचित सत्कार करण्यात आला .

श्री सतीश बलुतकर यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाची भूमिका व उद्देश स्पष्ट केला.




कार्यक्रमातील प्रमुख मार्गदर्शनामध्ये पोलीस विभागातील श्री बाबासाहेब आचार्य (पोलीस जमादार), श्री.त्र्यंबक फड (पोलीस अंमलदार शहर वाहतूक शाखा पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर), श्री स्वप्निल ओहाळ , सहाय्यक आरटीओ ऑफिसर (उप प्रादेशिक परिवहन कार्यालय अंबाजोगाई) वरील मान्यवरांनी विद्यार्थ्यांना वाहतूक नियम, रस्ते सुरक्षा, शालेय वाहतूक करताना घ्यावयाची काळजी तसेच सुरक्षित प्रवासाबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी वाहतूक नियमांचे पालन करावे आणि स्वतःबरोबरच इतरांच्या सुरक्षिततेचीही काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप मुख्याध्यापक श्री. अनंतराव कोपले यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी शाळा, चालक - वाहक आणि पालकांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे आभार श्रीमती भाग्यश्री खोसे यांनी मानले. शेवटी कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती लक्ष्मी घुगे यांनी केले , कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, परिवहन समितीचे सदस्य व स्कूल बस चालक उपस्थित होते

# उमरी येथील जुगार अड्डयावर पोलिसांचा छापा,१ लाख २८ हजाराचा मुद्देमाल जप्त

केज/प्रतिनिधी

केज येथील पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांना गोपनिय माहिती मिळाल्या वरून उमरी गावातील ओमकार किराणा दुकानाच्या पत्र्याच्या शेड मध्ये केज पोलिसांनी सोमवारी सायंकाळी पावणे चार वाजण्याच्या दरम्यान छापा मारून हार,जित वर तिर्रट नावाचा जुगार पत्त्याच्या पानावर पैसे लावुन खेळताना आठ जुगाऱ्यांना जेरबंद करण्यात आले असून, नगदी रोख १८ हजार ४०० रुपये ,७ मोबाईल मिळुन १लाख २८ हजार २०० रुपयाच्या मुद्देमाल यावेळी जप्त करण्यात आला आहे.

पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या आदेशावरून सहाय्यक पोलीस निरीक्षक लक्ष्मण उंबरे,पोलीस उपनिरीक्षक. अमिरोद्दीन इनामदार, जमादार बाळासाहेब अहंकारे,नितीन वारे, दादाराव देवगुडे, शिवाजी कागदे यांनी उमरी गावातील ओमकार किराणा नावाचे पत्राचे शेडमध्ये सोमवारी पावणे चार वाजण्याच्या दरम्यान




अचानक जावुन छापा मारला असता,यावेळी छाप्यामध्ये हार,जित वर तिर्रट नावाचाजुगार पत्त्याच्या पानावर पैसे लावुन खेळत असतांना अंकुश माणीक जाधव, अविनाश गंगाराम मुळे,प्रदीप दिलीप पवार,ज्ञानोबा गोकुळ भैरट,राजाभाऊ संपत मुळे,नवनाथ तुळशीराम शिंपले सर्व रा.उमरी,बादल विठ्ठल पवार रा.शाम नगर लातुर,अभिमान कसबे रा.उमरी असे आठ आरोपी मिळुन आले व राजाभाऊ अंगद भैरट रा.उमरी हा पोलीसांना पाहुन पळुन गेला आहे यावेळी आरोपीच्या ताब्यातील रोखरक्कम १८ हजार ४००,७ मोबाईल,सह एकुण १लाख २८ हजार २०० रुपयाचा मुद्देमाल जप्त करून सहाय्यक पोलीस निरीक्षक लक्ष्मण उंबरे यांच्या फिर्यादीवरून सोमवारी रात्री ७-३० वाजता महाराष्ट्र जुगार कायदयानुसार आठ आरोपी विरुध्द केज पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला असुन, पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार तुकाराम मुरकुटे हे पुढील तपास करीत आहेत.




# उपोषणाच्या दणक्याने प्रशासन नमले

### २५ ऑगस्टपर्यंत रस्ता-नालीचे काम पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन नगरपंचायतीला अखेर जाग

घनसावंगी प्रतिनिधी :-

ग्रामीण रुग्णालयासमोरील निकृष्ट रस्ता आणि नालीच्या कामाविरोधात पुकारलेल्या आमरण उपोषणापुढे अखेर नगरपंचायत प्रशासनाला नमते घ्यावे लागले. नगरपंचायत सदस्य मुजाहेद अली खान यांनी १० ऑगस्टपासून सुरू केलेल्या उपोषणाची सायंकाळी मुख्याधिकाऱ्यांनी दिलेल्या लेखी आश्वासनानंतर सांगता करण्यात आली.

ग्रामीण रुग्णालयासमोरील रस्ता व नालीच्या कामात निकृष्ट दर्जाचा आरोप करत मुजाहेद अली खान यांनी संबंधित कामाची चौकशी करून दर्जेदार आणि टिकाऊ काम करण्याची मागणी केली होती. परिसरातील नागरिकांना रस्त्यावर साचणारे पाणी नालीची अपुरी व्यवस्था तसेच वाहतुकीच्या अडचणींना सातत्याने सामोरे जावे लागत असल्याने प्रशासनाच्या कारभाराविरोधात तीव्र नाराजी होती.

उपोषण सुरू होताच प्रशासनाची धावपळउपोषण सुरू झाल्यानंतर प्रशासनावर दबाव वाढला. अखेर नगरपंचायत प्रशासनाने लेखी आश्वासन देत ग्रामीण रुग्णालयासमोरील रस्ता व नालीचे प्रलंबित काम २५ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्यात येईल असे स्पष्ट केले. प्रशासनाच्या या लेखी आश्वासनानंतर मुजाहेद अली खान यांनी उपोषण स्थगित केले.उपोषणाच्या दणक्यानंतर प्रशासनाने काम पूर्ण करण्याची अंतिम मुदत दिली असली तरी आता प्रत्यक्षात २५ ऑगस्टपर्यंत काम पूर्ण होते का याकडे संपूर्ण परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे. यापूर्वीच्या कामाच्या दर्जाबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांमुळे नव्याने होणारे काम दर्जेदार होणार का याचीही चर्चा सुरू आहे.

२५ ऑगस्टची मुदत प्रशासनासाठी आता कसोटीची ठरणार असून दिलेले लेखी आश्वासन पाळले नाही तर पुढील आंदोलनाची भूमिका काय असेल याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# कर्जमाफिच्या लाभापासून शेतकरी वंचित राहू नयेत; आमदार भीमराव केराम यांचा प्रशासनाला स्पष्ट निर्देश

## किनवट तहसील कार्यालयात आज(दि.११) कर्जमाफी योजनेचा आ. केराम यांच्याकडून तातडीचा आढावा; बँका, कृषी विभाग, महसूल व सेतू केंद्रांच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती

किनवट प्रतिनिधी, दि. ११ : किनवट तालुक्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी योजनेचा लाभ मिळताना येणाऱ्या विविध प्रशासकीय व तांत्रिक अडचणींचा तातडीने निपटारा करण्यासाठी आज, मंगळवार दि. ११ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता तहसील कार्यालय, किनवट येथे आमदार भीमराव केराम यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण आढावा बैठक आयोजित करण्यात आली या बैठकीत संबंधित सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांकडून आढावा घेण्यात आला. किनवट तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांना कर्जमाफी योजनेचा लाभ मिळण्यात अडचणी येत असल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. काही पात्र शेतकरी अद्याप लाभापासून वंचित असून, काही प्रकरणे बँक स्तरावर प्रलंबित आहेत. आधार प्रमाणीकरणातील तांत्रिक अडचणी, कर्ज खात्यांमधील माहितीतील तफावत, कर्ज रकमेबाबत विसंगती तसेच प्रस्तावांच्या प्रक्रियेत होणारा विलंब या प्रश्नांमुळे शेतकऱ्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर आमदार भीमराव केराम यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी गांभीर्याने घेत संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय साधून प्रलंबित प्रश्नांचा तातडीने निपटारा करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. त्यांच्या संदर्भातील दि. ७ ऑगस्ट २०२६ रोजीच्या पत्रानंतर तहसील कार्यालयाकडून दि. १० ऑगस्ट रोजी संबंधित विभागांना आढावा बैठकीस उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले होते.

### प्रलंबित कर्जमाफी प्रकरणांवर होणार थेट आढावा

बैठकीत कर्जमाफी योजनेतील प्रलंबित प्रस्तावांची विभागनिहाय माहिती घेण्यात येणार असून, पात्र असूनही लाभ न मिळालेल्या शेतकऱ्यांची प्रकरणे प्राधान्याने निकाली काढण्याबाबत चर्चा होणार आहे. बँक स्तरावर अडकलेल्या प्रस्तावांची कारणे जाणून घेऊन त्यावर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. याशिवाय आधार प्रमाणीकरणाच्या प्रक्रियेत येणाऱ्या तांत्रिक अडचणी, सेतू सुविधा केंद्रांवरील समस्या आणि शेतकऱ्यांच्या कागदपत्रांशी संबंधित अडथळे यांचाही आढावा घेतला गेला.

### बँक व कृषी विभागात समन्वयाची गरज

काही शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यातील रक्कम आणि संबंधित योजनेतील नोंदी यामध्ये तफावत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे बँका, कृषी विभाग, महसूल यंत्रणा आणि संबंधित सेवा केंद्रांनी परस्पर समन्वयाने प्रकरणे तपासणे आवश्यक आहे. कर्जमाफीचा लाभ देताना केवळ तांत्रिक किंवा प्रशासकीय त्रुटींमुळे पात्र शेतकरी वंचित राहू नये, अशी आमदार केराम यांची भूमिका मांडली आहे.



### सर्व संबंधित विभागांना अद्ययावत अहवालासह उपस्थित राहण्याचे निर्देश

तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी, किनवट यांच्या कार्यालयाकडून जारी करण्यात आलेल्या पत्रानुसार सहायक निबंधक, सहकारी संस्था; तालुका कृषी अधिकारी; सर्व ग्राम महसूल अधिकारी; ग्रामपंचायत अधिकारी; भारतीय स्टेट बँक तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व मराठवाडा ग्रामीण बँकेच्या संबंधित शाखांचे व्यवस्थापक आणि सेतू सुविधा केंद्रांच्या चालकांना बैठकीस उपस्थित होते. संबंधित अधिकाऱ्यांनी आपल्या विभागातील प्रलंबित प्रकरणांची अद्ययावत आकडेवारी, त्यामागील कारणे आणि करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल सोबत आणण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

### 'शेतकऱ्यांचा प्रश्न कागदावर न राहता प्रत्यक्ष मार्गी लागला पाहिजे'

किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघातील शेतकरी मोठ्या प्रमाणावर शेतीवर अवलंबून असून, नैसर्गिक आपत्ती, उत्पादन खर्च, बाजारभाव आणि आर्थिक अडचणींच्या पार्श्वभूमीवर कर्जमाफीचा लाभ त्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळण्यात कोणत्याही स्तरावर अनावश्यक विलंब होऊ नये, यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने काम करावे, अशी आमदार भीमराव केराम यांची अपेक्षा आहे.

शेतकऱ्यांना वारंवार कार्यालये व बँकांच्या फेऱ्या माराव्या लागू नयेत, तांत्रिक त्रुटी तातडीने दूर कराव्यात आणि पात्र लाभार्थ्यांच्या प्रकरणांचा वेळेत निपटारा करावा, या दृष्टीने आजच्या बैठकीत ठोस निर्णय होण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. आमदार केराम यांच्या पुढाकारामुळे कर्जमाफी योजनेतील प्रलंबित प्रश्नांना गती मिळण्याची शक्यता असून, 'पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहणार नाही' या दृष्टीने प्रशासनाकडून प्रभावी कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

# प्रसुती गृह व शस्त्रक्रिया ऑपरेशन थिएटर कार्यान्वित करा ,भाजपा नगरसेवक संजय पाटील घोगरे

नवीन नांदेड:नांदेड वाघाळा शहर महानगर पालिकेच्या आयोजित सर्वसाधारण सभेत सिडको परिसरातील मातृ सेवा आरोग्य केंद्र येथे पुर्ण वेळ महिला व पुरुष डॉक्टर सह प्रसुती गृह व शस्त्रक्रिया ऑपरेशन थिएटर कार्यान्वित करून सर्व सामान्य जनतेला दिलासा देऊन हडको परिसरातील लहुजी नगर भागातील नागरिकांच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेला गेल्या अनेक वर्षांपासूनचा रस्ता तात्काळ मुख्य रस्त्यास जोडुन येथील नागरिकांना जाण्यासाठी व येणाऱ्या साठी मोकळा करून द्यावा अशी मागणी भाजपाचे नगरसेवक संजय पाटील घोगरे यांनी केली असून अशी मागणी करून प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.

नावामनपाची सर्वसाधारण सभा ११ ऑगस्ट रोजी मुख्यालयात आयोजित करण्यात आली होती यावेळी महापौर सौ.कविता संतोष मुळे, उपमहापौर दिपक सिंह रावत, आयुक्त डॉ.महेश कुमार डोईफोडे, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम,निलेश सुंकेवार यांच्या सह विविध विभागांचे सहायक आयुक्त,विभाग प्रमुख व नगरसेवक यांच्यी उपस्थिती होती.

यावेळी सिडको येथील मातृ सेवा आरोग्य केंद्र येथे गेल्या काही वर्षांपुर्वी प्रसुती गृह व शस्त्रक्रिया ऑपरेशन थिएटर सह पुर्ण वेळ महिला व पुरुष डॉक्टर कार्यान्वित होते ते बंद करून नांदेड येथे हालविणयात आल्यामुळे महिला रूग्णांना सह सामान्य रुग्णांना आर्थिक फटका बसत असल्याने पुन्हा या ठिकाणी चालु करून दिलासा द्यावा यासह नांदेड ऊस्मानगर कंधार मुख्य मार्गावर असलेल्या मनपा हद्दीतील मनपा प्रभाग क्रमांक २० मधील लहुजी नगर भागातील मुख्य रस्ता बाबत माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या उपस्थितीत लहुजी नगर हडको भागातील मुख्य मार्गा लगत असलेल्या वसाहतीत गेल्या अनेक वर्षांपासून जवळपास शेकडो कुटुंबे या परिसरात वास्तव्यास असून राज्य शासनाच्यी अश्राम शाळा या परिसरात असुन भुखंड धारकांनी गेल्या अनेक वर्षांपासून हा रस्ता भिंत बांधून बंद केला असल्याने या रस्त्यावर असलेले संबंधित भुखंड धारकांना मावेजा देऊन हा रस्ता मोकळा करावा अशी मागणी करण्यात आली होती,या मागणी संदर्भात माजी मुख्यमंत्री चव्हाण यांच्या कडे लक्ष वेधले होते परंतु अद्यापही मनपा प्रशासनाने या बाबत काहीच कार्यवाही न केल्याने परिसरातील नागरिक व संबंधित शाळेचे शिक्षक विद्यार्थी आपली सायकल,दुचाकी, तिनचाकी, चारचाकी वाहने मुख्य रस्त्यावर लावुन सुमारे एक किलो मिटर पायी जात आहेत तर पावसाळ्यात नागरीकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे यामुळे संबंधित भुखंड धारकांना मावेजा अथवा अतिक्रमण काढून तात्काळ रस्ता मोकळा करून द्यावा अशी मागणी केली असून या



मागणी संदर्भात प्रशासनाने नोंद घेतली आहे.

या मागणीला सभागृहातील सदस्यांनी पाठिंबा दर्शविला असून लवकरच प्रशासनाकडून कार्यवाही होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# पदवी प्रथम वर्ष प्रवेशाची अंतिम मुदत २० ऑगस्टपर्यंत वाढविली

नांदेड जिल्हा प्रतिनिधी :-
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता पदवी प्रथम वर्ष प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना दिलासा देण्यात आला आहे. विविध महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या विनंतीनुसार प्रथम वर्ष प्रवेशाची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ ऐवजी आता २० ऑगस्ट २०२६ करण्यात आली आहे.

विद्यापीठाने यापूर्वी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी शैक्षणिक वेळापत्रक निश्चित केले होते. त्यानुसार प्रथम वर्ष प्रवेशाची अंतिम तारीख १८ जून २०२६ ते २४ जून २०२६ अशी होती. तसेच मार्च २०२६ मध्ये बारावीची पुरवणी परीक्षा देऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रथम वर्ष प्रवेशासाठी ३१ जुलै २०२६ पर्यंत संधी देण्यात आली होती.

मात्र, विविध महाविद्यालयांच्या




प्राचार्यांनी केलेल्या विनंतीचा विचार करून विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी प्रथम वर्ष प्रवेशासाठी मुदतवाढ देण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार प्रवेशाची अंतिम तारीख आता २० ऑगस्ट २०२६ अशी निश्चित करण्यात आली आहे.

याबाबत विद्यापीठाच्या शैक्षणिक नियोजन व विकास विभागाने दि.११ ऑगस्ट २०२६ रोजी शुद्धीपत्रक जारी केले असून, सर्व संबंधितांनी सुधारित मुदतीची नोंद घ्यावी, असे विद्यापीठ प्रशासनाने कळविले आहे.

मुदतवाढीमुळे अद्याप पदवी प्रथम वर्षासाठी प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार असून, संबंधित विद्यार्थ्यांनी वाढीव मुदतीचा लाभ घेऊन प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन शैक्षणिक नियोजन व विकास विभागाचे उपकुलसचिव यांनी केले आहे.

# व्यंकटराव मोकले यांच्या पत्नी सौ. संगिता मोकले यांचे दीर्घ आजाराने निधन

नांदेड जिल्हा प्रतिनिधी : भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य तथा धनगर समाजाचे नेते व्यंकटराव मोकले यांच्या पत्नी सौ. संगिता व्यंकटराव मोकले यांचे पुणे येथील दिनानाथ मंगेशकर रुग्णालयामध्ये दीर्घ आजाराने



उपचारादरम्यान दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ५४ वर्षे होते. त्यांच्या निधनाने मोकले कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच धनगर समाजात हळहळ व्यक्त होत आहे.

सौ. संगिता मोकले या प्रेमळ, मनमिळावू आणि कुटुंबवत्सल स्वभावाच्या होत्या. गेल्या काही काळापासून त्यांच्यावर आजारासाठी उपचार सुरू होते. पुणे येथील दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात पती व्यंकटराव मोकले, एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे.

सौ. संगिता मोकले यांच्या नाईकनगर , नांदेडच्या निवासस्थानापासून अंत्ययात्रा निघणार असून त्यांच्यावर बुधवार, दि. १२ ऑगस्ट रोजी सकाळी ९.३० वाजता शांतिधाम, गोवर्धन घाट, नांदेड येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# अपघातांची मालिका थांबेना; राज्य रस्ता क्रमांक २५१ ठरतोय मृत्यूचा सापळा

## हदगाव-तामसा मार्गावर भीषण अपघात; मोटारसायकलस्वार गंभीर जखमी, नांदेडला हलविले

पोलीसाची माणुसकी मूळ जीव वाचला..

तामसा, दि. १० ऑगस्ट : हदगाव-तामसा राज्य रस्ता क्रमांक २५१ वर अपघातांची मालिका सुरूच असून, रस्त्यावरील सुरक्षाव्यवस्थेच्या अभावामुळे हा मार्ग वाहनचालकांसाठी धोकादायक ठरत आहे. सोमवारी (दि. १० ऑगस्ट) रात्री सुमारे आठ वाजण्याच्या सुमारास तामसा येथे मोटारसायकल आणि ऑटोची जोरदार धडक होऊन मोटारसायकलस्वार गंभीर जखमी झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, हदगावकडून तामसाकडे प्रवासी वाहतूक करणारा ऑटो येत होता. त्याचवेळी तामसाकडून आपल्या गावाकडे रंगरंगोटीचे काम करणारा कामगार मोटारसायकलवरून जात होता. मोटारसायकलवरील चालकाचा ताबा सुटल्याने त्याची समोरून येणाऱ्या ऑटोला जोरदार धडक झाली. धडक एवढी भीषण होती की मोटारसायकलचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

या मार्गावर योग्य ठिकाणी डिव्हायडर नसल्याने वाहने विरुद्ध दिशेने जाण्याचा धोका वाढला आहे. तसेच गतिरोधक, दिशादर्शक फलक आणि इतर आवश्यक सुरक्षा उपायांचा अभाव असल्याने अपघातांना आमंत्रण मिळत असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे.

दरम्यान, या मार्गावरील सुरक्षेच्या उपाययोजनांसाठी आमदार बाबुराव कदम यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला मे महिन्यात पत्र देऊन संबंधित राज्य महामार्गावर डिव्हायडर, गतिरोधक आणि दिशादर्शक फलक तातडीने बसविण्याची मागणी केली होती. मात्र, या मागणीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने दुर्लक्ष



केल्याचा आरोप होत असून, संबंधित पत्राला केराची टोपली दाखविण्यात आल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांमधून व्यक्त होत आहे. दुर्घटनाचे वेळेस त्या मार्गाने आपला शासकीय काम आटपून हदगाव कडे पोलीस वाहनात जाताना

अपघाताचे दृश्य पाहून आपलं वाहन थांबविले हदगाव पोलीस ठाण्याचे सपोनी दिगंबर पाटील तसेच पोलीस कर्मचारी पांचाळ यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि तामसा पोलीस ठाण्याला माहिती दिली. हदगाव पोलिसांनी जखमी मोटारसायकलस्वार रवी सुभाष वाघमारे (वय ३०, रा. कोळगाव) यांना एका खासगी कारमधून तातडीने प्राथमिक आरोग्य केंद्र, तामसा येथे उपचारासाठी पाठविले.

यावेळी जखमीसोबत अमोल वानखेडे यांनीही तातडीने मदत करत जखमीला उपचारासाठी दाखल केले. वेळेत उपचार मिळाल्याने रवी वाघमारे शुद्धीवर आले. मात्र, प्रकृती चिंताजनक असल्याने प्राथमिक उपचारानंतर त्यांना पुढील उपचारासाठी नांदेड येथे रेफर करण्यात आले.राज्य रस्ता क्रमांक २५१ वर वारंवार होणाऱ्या अपघातांची गंभीर दखल घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने डिव्हायडर, गतिरोधक, दिशादर्शक फलक आणि आवश्यक सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर यांना 'सामाजिक आयकॉन पुरस्कार' प्रदान करण्यात येणार

नांदेड जिल्हा प्रतिनिधी सामाजिक क्षेत्रात गेल्या चार दशकांहून अधिक काळ सातत्याने उल्लेखनीय कार्य करणारे धर्मभूषण ड. दिलीप ठाकूर यांना 'सामाजिक आयकॉन पुरस्कार' प्रदान करण्यात येणार दि. १५ ऑगस्ट रोजी सकाळी ११.३० वाजता कुसुम सभागृह, नांदेड येथे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती सप्तरंग सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा डॉ. सान्वी जेठवाणी यांनी दिली. ड. दिलीप ठाकूर यांना यापूर्वी देश-विदेशातून ११४ पुरस्कार प्राप्त झाले असून, हा त्यांचा विक्रमी ११५वा पुरस्कार ठरणार आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल प्रा. लक्ष्मी पुरणशेटीवार, प्रा. ओमप्रकाश दरक यांच्यासह अनेक हितचिंतकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.*

सामाजिक कार्याचा वसा घेतलेल्या ड. दिलीप ठाकूर यांनी गेल्या २३ वर्षांत २५ लाखांहून अधिक जेवणाचे डबे गरजूंना वितरित केले आहेत. रस्त्यावर आयुष्य कंठणाऱ्या, बेसहारा, असहाय, दुर्बल व मानसिक संतुलन गमावलेल्या व्यक्तींसाठी गेल्या ८१ महिन्यांपासून 'कायापालट' उपक्रम राबविला जात आहे. दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी अशा व्यक्तींना एकत्र करून त्यांची केस-दाढी कटिंग, स्वच्छ पाण्याने अंघोळ, नवीन कपडे आणि १०० रुपयांचे बक्षीस देऊन त्यांना सन्मानाने समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला जातो. गेल्या सात वर्षांत हिवाळ्यात सलग ४० रात्री रस्त्यावर झोपणाऱ्या बेघर नागरिकांना १४ हजारांहून अधिक उबदार चादरी, तर 'कृपाछत्र' उपक्रमातून पावसाळ्यात १४ हजारांहून अधिक छत्र्या वितरित करण्यात आल्या आहेत. यावर्षीही २०२६ छत्र्या वाटपाचा उपक्रम सुरू आहे. 'चरण सेवा' उपक्रमांतर्गत उन्हाळ्यात नंगेपाय चालणाऱ्या गरजू नागरिकांना १४ हजार चप्पलांचे वितरण करण्यात आले आहे.

नांदेड शहरात अन्न वाया जाऊ नये आणि कोणीही उपाशी राहू नये, या उद्देशाने सहा वर्षांपूर्वी 'भाऊचा मानवता फ्रिज' सुरू करण्यात आला. या फ्रिजमध्ये दररोज किमान ४० ते १२० जेवणाचे डबे ठेवले जातात आणि गरजू नागरिक त्याचा लाभ घेतात. सामाजिक कार्यासोबतच धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रातही ड. ठाकूर यांचे योगदान आहे. सत्यगणपती, औंढा नागनाथ, श्रीक्षेत्र माहूर, रत्नेश्वरी आदी ठिकाणी पदयात्रांचे आयोजन करून त्यांनी धर्मासोबतच आरोग्यविषयक जनजागृती केली आहे. 'ना नफा, ना तोटा' या तत्त्वावर गेल्या २६ वर्षांपासून दरवर्षी अमरनाथ यात्रेचे आयोजन केले जाते. या माध्यमातून शेकडो ज्येष्ठ नागरिकांना अमरनाथ यात्रेचा अनुभव घेता आला आहे. तसेच गेल्या २५ वर्षांपासून त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त 'गोदावरी गंगा पूजा' आयोजित केली जाते, ज्यामध्ये दरवर्षी हजारो महिला सहभागी होतात.

गेल्या ३६ वर्षांपासून एसटी कर्मचारी गणेश मंडळाला दरवर्षी गणेशमूर्ती देण्याची परंपरा त्यांनी कायम ठेवली आहे. नांदेडमध्ये स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, विविध क्रीडा स्पर्धा, निबंध व वक्तृत्व स्पर्धा अशा ९० हून अधिक उपक्रमांचे दरवर्षी आयोजन केले जाते. शालेय साहित्य वाटप, आरोग्य तपासणी शिबिरे आणि मोफत औषध वाटपाचे कार्य गेल्या ४० वर्षांपासून सुरू आहे. या विविध सामाजिक, धार्मिक आणि सेवाभावी कार्याची दखल घेत त्यांना आतापर्यंत ११४ पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले असून, आता 'सामाजिक आयकॉन पुरस्कार' हा त्यांचा ११५वा पुरस्कार ठरणार आहे.

दरम्यान, सप्तरंग सेवाभावी संस्था व जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने 'सप्तरंग सांस्कृतिक महोत्सव-२०२६' दि. १४ ते १६ ऑगस्टदरम्यान कुसुम सभागृह येथे आयोजित करण्यात आला आहे. या तीन दिवसीय महोत्सवात राष्ट्रीय नृत्य व संगीत स्पर्धांसह शास्त्रीय नृत्य, लोकनृत्य, लावणी, उपशास्त्रीय नृत्य, गायन व वादनाचे कार्यक्रम होणार आहेत. याशिवाय तृतीयपंथी सशक्तीकरण चर्चासत्र, जनजागृती व रोजगार मेळावा तसेच तिन्ही दिवस भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. कला, साहित्य, आरोग्य, समाजसेवा व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांचा यावेळी गौरव करण्यात येणार आहे. धर्मभूषण ड. दिलीप ठाकूर यांच्या



११५व्या पुरस्कार सोहळ्यास त्यांच्या कार्यावर प्रेम करणाऱ्या हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अमरनाथ यात्री संघाच्या वतीने करण्यात आले आहे.